दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७२ | शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

## भ्रष्टाचाराची वाळवी आणि प्रशासनाचा कणा

पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना विभागातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी त्यातून महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. कारण हा विषय केवळ दोन अधिकाऱ्यांपुरता मर्यादित नसून, बांधकाम परवानग्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व किती आहे, याची कसोटी आहे.

# आता शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्यांना अपघात विमा संरक्षण

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेची व्याप्ती वाढली; भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकऱ्यांचाही समावेश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. 'गोपीनाथ मुंडे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना' आता १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, या योजनेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली असून, आता केवळ खातेदार शेतकरी आणि कुटुंबातील एका सदस्यापुरते संरक्षण मर्यादित राहणार नाही. शेतकरी कुटुंबातील पात्र सर्व सदस्यांना योजनेचे संरक्षण मिळणार आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) जारी करण्यात आला आहे.**



यापूर्वी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना २०२३–२४ ते २०२५–२६ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी राबविण्यात आली होती. या कालावधीत योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन केल्यानंतर ती अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि व्यापक करण्याच्या दृष्टीने शासनाने योजनेच्या स्वरूपात महत्त्वाचे बदल केले आहेत. राज्यात शेती व्यवसायामध्ये भूमिहीन शेतमजुरांचा मोठा वाटा आहे. शेतात प्रत्यक्ष काम करताना शेतकऱ्यांप्रमाणेच शेतमजुरांनाही विविध अपघातांचा धोका असतो. मात्र, यापूर्वी या योजनेत भूमिहीन शेतमजुरांचा समावेश नव्हता. त्यामुळे अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास त्यांच्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळत होते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने योजनेची व्याप्ती वाढवत भूमिहीन शेतमजुरांनाही अपघात सुरक्षा संरक्षणाच्या ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### सोनम वांगचुक यांचा नव्या आंदोलनाचा इशारा

दिल्लीः हवामान कार्यकर्ते आणि लेह एपेक्स बॉडी चे सदस्य सोनम वांगचुक यांनी सांगितले की, २२ मे च्या बैठकीनंतर कोणतीही ''विशेष प्रगती'' झालेली नाही. तर कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्सचे प्रतिनिधी सज्जाद कारगिली म्हणाले की, प्रस्तावित संस्थेची रचना आणि अधिकारांचा तपशील देणारा मसुदा मिळेल या अपेक्षेने शिष्टमंडळ दिल्लीत आले होते. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार २०२१ मध्ये केंद्रासोबत चर्चा सुरू झाल्यापासून एलएबी आणि केडीए या संघटना केंद्रशासित प्रदेश पातळीवर निर्वाचित संस्था तसेच जमीन, नोकऱ्या, संस्कृती आणि अस्मितेच्या सुरक्षेची मागणी करत आहेत. ''सरकारकडून कोणतेही आश्वासन न मिळाल्यास लडाखच्या प्रश्नांवर आम्ही १९ ते २४ सप्टेंबर दरम्यान नवीन आंदोलन सुरू करू,'' असा इशारा सोनम वांगचुक यांनी दिला. पुढील बैठक ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात कारगिलमध्ये होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. लडाखला २०१९ मध्ये विधानसभा नसलेला केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले होते. २२ मे रोजी झालेल्या चर्चेत निर्वाचित केंद्रशासित प्रदेश–स्तरीय संस्था आणि कलम ३७१ अंतर्गत विशेष घटनात्मक संरक्षण आराखड्यावर तत्वतः सहमती झाली होती.

### लालू, राबडी अन् तेजस्वी यादवांवर दोषारोप

पाटणाः राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबाच्या अडचणीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे. आयआरसीटीसी मनी लाँड्रिंग प्रकरणात लालू प्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी आणि मुलगा तेजस्वी यादव यांच्यासह एकूण ९ जणांवर न्यायालयाने अधिकृतपणे दोषारोप निश्चित केले आहेत. त्यांच्यावर मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत हे आरोप ठेवण्यात आले आहेत. दिल्लीतील राऊज एव्हेन्यू कोर्टाने या प्रकरणात दिलासा देत इतर ७ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ऑक्टोबर महिन्यात होणार आहे. लालू प्रसाद यादव केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये रेल्वे मंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात आयआरसीटीसीच्या दोन हॉटेलसच्या संचालनाचे कंत्राट एका खासगी कंपनीला देण्यात आले होते.

### इस्रोचे तंत्रज्ञान संपूर्ण जगासाठी उपयुक्त–मोदीं

दिल्लीः भारताच्या अंतराळ संशोधन प्रवासाच्या केंद्रस्थानी असलेल्या इस्रोने आपल्या उत्कृष्ट कामगिरी आणि किफायतशीर मोहिमांमुळे जागतिक स्तरावर यश मिळविले आहे. इस्रोचे तंत्रज्ञान आणि भागीदारी केवळ भारतासाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी उपयुक्त ठरत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रोची प्रशंसा केली. पॅरिसमध्ये आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय अंतराळ शिखर परिषदेला व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी इस्रो आणि त्यांच्या शास्त्रज्ञांचे कौतुक केले. इस्रोच्या उत्पादन आणि ऑपरेशनल कार्यांचे खासगी संस्थांकडे हस्तांतरण करण्याच्या प्रस्तावाबाबत इस्रोच्या नऊ कर्मचारी संघटनांनी अध्यक्षांना पत्र लिहिल्यानंतर काही दिवसांतच पंतप्रधानांनी हे प्रतिपादन केले. नरेंद्र मोदी म्हणाले, इस्रोची क्षमता शेतकरी, मच्छिमार, हवामान अंदाज, आपत्ती व्यवस्थापन आणि नेव्हिगेशन (मार्गक्रमण) यांसाठी उपयुक्त ठरत आहे;. तसेच ३४ देशांचे ४३० हून अधिक उपग्रह भारतीय रॉकेटद्वारे अंतराळात पाठवण्यात आले आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०८ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५१.५० क्विंटल | २,६५१ | ३,००० | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड: ४९.०० क्विंटल | २,६५० | ५,६२३ | ३,५२९ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ८,३७० | ८,३७० | ८,३७० |
| बाजरी: ११४.०० क्विंटल | २,६२० | ३,१२१ | २,७९८ |
| मुग: ७.०० क्विंटल | ८,२१० | ९,५११ | ९,१४४ |
| सोयाबीन: २९.५० क्विंटल | ६,०११ | ६,०११ | ६,०११ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१५० | ६,०७६ |

# राष्ट्रीय पुरस्कार गुजरातमध्येच का?

## राज ठाकरे यांचा सवाल, कलाकारांना केले उठावाचे आवाहन




मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच हे पुरस्कार देशाच्या राजधानीच्या दिल्ली शहरातून हलवून गुजरातमध्ये केवाडिया येथे होणार आहेत. देशाच्या आर्थिक राजधानीचे मुंबई शहराचे महत्व संपवण्याचा खटाटोप एकीकडे सुरू असताना दुसरीकडे देशाच्या राजधानीचे जे महत्व आहे ते हळूहळू संपवण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. मुळात हा पुरस्कार सोहळा हलवण्याचे कारण काय ? स्वतःला काही निर्माण करता आले नाही की बदल नावे, बदल स्थळे आणि यातून भ्रामक इतिहास निर्माण करण्याचा प्रयत्न सध्या सुरु आहे असे ◀◀ पान २ वर

### देशातील कलाकारांनी विरोध करावा...

शेवटी आपल्या पोस्टमधून राज ठाकरे म्हणाले की, भारतातील इतर प्रांतांचे नागरिक आणि नेते आपल्या राज्यांवर, तिथल्या व्यावसायिकांवर काय अन्याय झाला याचा हिशेब ठेवतील. या विषयाला आम्ही वाचा फोडूच पण देशातील समस्त कलाकारांनी पण भूमिका घ्यायला हवी. सरकारच्या स्तुतीची गीतं गायला सांगितली की ती लगेच गायला सुरुवात केल्यामुळे आजची ही वेळ आली आहे. त्यामुळे सर्वांनी याविरोधात भूमिका घ्यायलाच हवी आणि महाराष्ट्र आणि दक्षिणेतील राज्यांनी जर कणखर भूमिका नाही घेतली तर या दख्खन प्रांताची जी ओळख आणि अस्मिता आहे त्यावरच हे वरवंटा फिरवतील आणि तेंव्हा वेळ निघून गेलेली असेल असा इशाराही राज ठाकरे यांनी दिला आहे.

# नियमाप्रमाणे एसइबीसी किंवा कुणबी एकच निवडावं लागेल!

✻ वंशावळ सिद्ध करा, दोनच दिवसात प्रमाणपत्र शक्य नाही

✻ मनोज जरांगेंच्या मागण्यांवर जालना जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले नियम


जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले असून त्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने केलेल्या कामांची आणि नियमांची सविस्तर माहिती दिली. कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कायदेशीर नियमांचे पालन करणे आणि



वंशावळ सिद्ध करणे बंधनकारक असून, आवश्यक पुराव्यांशिवाय दाखले दिले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी स्पष्ट केले. दरम्यान, उपोषणकर्ते मनोज जरांगे यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून, प्रशासनाचे वैद्यकीय पथक घटनास्थळी कायम तैनात आहे. बुधवारी त्यांना आठ सलाईन लावण्यात आल्याची माहितीही जिल्हाधिकारी मित्तल यांनी दिली.

मित्तल म्हणाल्या, जिल्ह्यात मराठा–कुणबी व कुणबी–मराठा अशा एकूण ५,०२७ नोंदी आढळून आल्या आहेत. यासंदर्भात जिल्ह्यात आतापर्यंत १८,२०० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असून, २ सप्टेंबरच्या शासन ◀◀ पान २ वर



## नाशिक कुंभमेळ्यासाठी १,८०० कोटींना मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याशी संबंधित कामांसाठी १,८०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. योग्य ती मंजुरी मिळाल्यानंतरच हा निधी कार्यक्रमाच्या मंजूर उद्दिष्टांसाठी काटेकोरपणे वापरावा, असे निर्देश सरकारने दिले आहेत. ◀◀ पान २ वर

# ज्या मातेच्या कुशीतून जन्मलो, त्या संस्काराचे वर्तन ठेवा!

## डॉ.ज्योती मेटेंचा मनोज जरांगेंना सल्ला

बीड । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील १५ मागण्यांच्या बाबत तपशिलाने विचार केला तर यातील बारा मागण्या पूर्ण झाल्याचे मला दिसते. त्याबरोबरच शासनाने चर्चेची सर्व दारे खुली ठेवलेली आहेत. आपण जेव्हा आंदोलनाचे नेतृत्व



करतो तेव्हा त्या आंदोलनाची यशस्वी अथवा अयशस्वी, जी काही असेल ती सांगता होणे गरजेचे असते. जरांगे पाटील यांनी प्रत्येक मागणीचा तपशिलाने विचार करावा आणि मगच काय तो निर्णय घ्यावा, असे ◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट–हर्षवर्धन सपकाळ

दिल्ली । वृत्तसंस्था

राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे पण सरकारचे मात्र त्यांच्याकडे लक्ष नाही. कुंभमेळ्यातील सीसीटिव्ही वर ३०० कोटी खर्च करणारे महायुती सरकार शेतकऱ्यांना काहीही मदत करत नाही. शेतकऱ्यांच्या हातातोंडाचा घास हिरावला जात असताना मंत्रिमंडळ बैठकीत यावर काहीही चर्चा झाली नाही. शेतकऱ्यांची अवस्था पाहता सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

नवी दिल्लीतील नविन महाराष्ट्र सदन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम खरिपाचा आहे, पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. ◀◀ पान २ वर

# एमपीएससीच्या पेपरची पुन्हा तपासणी अन् एसआयटी चौकशीही होणार !

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा;विद्यार्थ्यांना दिलासा



मुंबई । प्रतिनिधी

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या निकालावरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाची मंत्रालयात पावणेदोन तास बैठक झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे. ◀◀ पान २ वर

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा महाराष्ट्र 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांनी स्वतः मूर्ती घडवून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

नवी मुंबई । प्रतिनिधी

गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्त्व असून, गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी ◀◀ पान २ वर



### मूर्ती घडवणारे विद्यार्थी वसुंधरा रक्षक

पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडवणाऱ्या या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा हा संदेश घराघरात पोहोचविणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे.

# भाजपचा 'ओबीसी डीएनए'चा दावा फोल?

## काँग्रेस किंवा वंचित सोबत राहिल्यास चित्र असेल वेगळे

मुंबई –बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा प्रश्न अत्यंत संवेदनशील व निर्णायक टप्प्यावर पोहोचला असताना, महायुती सरकार आणि विशेषतः भाजप या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा तीव्र आक्षेप आता ओबीसी घटकांतून नोंदवला जात आहे. ''ओबीसी हाच भाजपचा डीएनए आहे,'' असा दावा वारंवार करणाऱ्या भाजपने मराठा आरक्षणाच्या पेचप्रसंगात ओबीसींच्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्याने समाजात मोठा असंतोष खदखदू लागला आहे. त्यामुळे आता पेशींचा सत्ताधाऱ्यावर विश्वास राहिला नाही भविष्यात ओबीसींनी आपली ताकद वंचितला सोबत घेऊन काँग्रेसच्या पाठीमागे उभी केली तर वेगळे चित्र निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.**

गेल्या विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाने भाजपच्या पारड्यात भरभरून मते टाकून सत्तेचा मार्ग सुकर केला होता. मात्र, मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णयांचा थेट फटका ओबीसींच्या राजकीय व सामाजिक अधिकारांना बसल्याची भावना समाजात बळावली आहे. ज्या घटकाने पक्षाला




सत्तेवर बसवले, त्याच घटकाशी दुजाभाव केला जात असल्याची सार्वत्रिक खंत आता व्यक्त होत आहे. ओबीसींच्या हक्कांसाठी उभारली जाणारी आंदोलने सत्ताधारी यंत्रणेकडून दडपली जात असल्याचा थेट आरोप आंदोलकांकडून केला जात आहे अंतरवाली सराटी येथे ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी उपोषणाला बसलेले ॲड. मंगेश ससाणे यांचे आंदोलन प्रशासकीय दबावाने मोडीत काढण्यात आले. दुसरे ओबीसी हक्कांसाठी आवाज उठवणारे प्रा. लक्ष्मण हाके यांचा मोर्चा मध्येच अडवून सरकारने दडपशाहीचा मार्ग अवलंबल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटली.भाजपच्या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या अविश्वासामुळे ओबीसी समाजाला आता राजकीय पुनर्मांडणीची गरज भासत आहे. मराठा समाजही सरकारच्या निर्णयांवर समाधानी नाही आणि ◀◀ पान २ वर



## राज्यात काही जिल्ह्यांना वादळी पावसासह वीजांचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई वेधशाळेने पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. काही जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. ११ सप्टेंबर रोजी नाशिक घाट, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि ◀◀ पान २ वर

## अग्रलेख

# भ्रष्टाचाराची वाळवी आणि प्रशासनाचा कणा

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना विभागातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी त्यातून महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. कारण हा विषय केवळ दोन अधिकाऱ्यांपुरता मर्यादित नसून, बांधकाम परवानग्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व किती आहे, याची कसोटी आहे.

तक्रारींमध्ये प्रति चौरस फुटामागे ५ ते ६ रुपयांची कथित मागणी, तांत्रिक त्रुटींचे कारण पुढे करून फाईल्स महिनोन्महिने प्रलंबित ठेवणे आणि विकास प्रकल्पांशी संबंधित नकाशे, रस्ते किंवा आरक्षणांच्या मुद्द्यांचा कथित आर्थिक दबावासाठी वापर केल्याचे आरोप आहेत. हे आरोप चौकशीत सिद्ध होणे आवश्यक आहे; मात्र ते खरे ठरले तर ही बाब एखाद्या व्यक्तीच्या गैरवर्तनापेक्षा गंभीर ठरेल. फाईलची गती आणि आर्थिक व्यवहार यांच्यात संबंध निर्माण झाला असेल, तर त्यामागे संपूर्ण यंत्रणेतील कोणत्या त्रुटी कारणीभूत आहेत, याचा शोध घ्यावा लागेल. बांधकाम परवाना विभाग हा शहराच्या विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एका फाईलला अनावश्यक विलंब झाला तर त्याचा परिणाम कोट्यवधींच्या गुंतवणुकीवर, रोजगारावर आणि शहराच्या नियोजनावर होतो. त्यामुळे प्रशासनातील विलंब हा केवळ कार्यालयीन त्रुटी न राहता आर्थिक परिणाम घडवणारा घटक ठरू शकतो. अशा परिस्थितीत नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांचा प्रशासनावरील विश्वास टिकवणे ही पालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. एकाच महत्त्वाच्या पदावर अधिकारी दीर्घकाळ राहिल्यास हितसंबंधांचे जाळे निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे चौकशी निष्पक्ष व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या पदाबाबत प्रशासनाने योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. चौकशीदरम्यान फाईल्स, डिजिटल नोंदी किंवा इतर पुराव्यांवर कोणताही प्रभाव पडणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांच्या ज्ञात-अज्ञात मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांची सक्षम तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्याचा मार्गही खुला ठेवला पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश देणे ही सुरुवात आहे, शेवट नाही. अशा प्रकरणांत समिती नेमली जाते, काही दिवस चर्चा होते आणि नंतर अहवालाच्या प्रतीक्षेत प्रकरण थंडावते, असा अनुभव पुन्हा येता कामा नये. चौकशी कालबद्ध, स्वतंत्र आणि निष्पक्ष असली पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास कारवाई झालीच पाहिजे आणि आरोप निराधार ठरल्यास संबंधित अधिकाऱ्यांवरील संशयही स्पष्टपणे दूर झाला पाहिजे. मात्र कारवाई केवळ व्यक्तींवर थांबवून उपयोग नाही. बांधकाम परवानगीची प्रक्रिया अधिकाधिक ऑनलाइन, पारदर्शक आणि मानवी हस्तक्षेपमुक्त करणे आवश्यक आहे. प्रत्येक फाईल कोणत्या टप्प्यावर आहे, किती दिवस प्रलंबित आहे आणि निर्णयासाठी कोण जबाबदार आहे, याची डिजिटल नोंद उपलब्ध झाली तर 'फाईल अडवून ठेवण्याची' शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर केवळ कागदोपत्री डिजिटलायझेशनसाठी न करता उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी करायला हवा.

पिंपरी-चिंचवड हे राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि आर्थिक केंद्र आहे. अशा शहराच्या विकासाची चावी जर संशयास्पद व्यवहारांच्या सावलीत अडकली, तर नुकसान केवळ पालिकेच्या प्रतिमेचे होणार नाही; तर गुंतवणूकदार, व्यावसायिक आणि सामान्य करदात्यांचा व्यवस्थेवरील विश्वासही डळमळेल. म्हणूनच मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर आता पालिका प्रशासनाची खरी परीक्षा आहे. भ्रष्टाचाराची वाळवी केवळ दोन अधिकाऱ्यांवर कारवाई करून थांबणार नाही; तिला पोसणारी व्यवस्था बदलावी लागेल. चौकशीचा अहवाल, त्यावरील कारवाई आणि त्यानंतर होणाऱ्या प्रशासकीय सुधारणांतूनच पिंपरी-चिंचवडच्या प्रशासनाचा कणा खरोखर मजबूत आहे की तो कागदोपत्रीच उभा आहे, हे स्पष्ट होईल.

# अंबड उपविभागात कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाला वेग

**अंबड । प्रतिनिध**

**२६७ नोंदींच्या आधारे तब्बल ३,७९६ प्रमाणपत्रांचे वितरण; १० ते १६ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन अंबड उपविभागातील अंबड व घनसावंगी तालुक्यांमध्ये कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाची कार्यवाही महसूल प्रशासनाकडून पारदर्शक व गतिमान पद्धतीने सुरू आहे. नागरिकांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रशासनाने विशेष शिबिरांचे आयोजन केले आहे.**




न्यायमूर्ती शिंदे समितीच्या अहवालानुसार अंबड उपविभागातील १६ गावांमध्ये कुणबी जातीच्या २६७ नोंदी आढळून आल्या आहेत. अशी माहिती उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार सोमेश मोहिते यांनी दिली आहे. या नोंदींच्या आधारे संबंधित अर्जदारांची वंशावळ तपासून आतापर्यंत ३,७९६ कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णयानुसार आणखी १३ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. एका नोंदीमागे सरासरी १४ प्रमाणपत्रे प्रशासनाच्या कार्यवाहीची व्याप्ती आणि गती लक्षात घेतल्यास, उपलब्ध नोंदीनुसार एका नोंदीमागे सरासरी १४ प्रमाणपत्रे वितरित झाली आहेत. कुणबी नोंद असलेल्या कुटुंबातील सर्व वंशज, कुटुंबातील सदस्य आणि नातेवाईकांची वंशावळ तपासून पात्र नागरिकांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती कुणबी नोंदी आढळलेल्या सर्व गावांची यादी संबंधित ग्रामपंचायतींवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच विशेष शिबिरांची माहिती दवंडी, ग्रामपंचायत नोटीस बोर्ड आणि स्थानिक व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवली जात आहे. १० ते १६ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरे कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी मंडळ स्तरावर विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. १० सप्टेंबर २०२६ अंबड, कुंभारपिंपळगाव, राणी उंचेगाव ११ सप्टेंबर २०२६ शहागड, वडीगोद्री, राजणी, पानवाडी १२ सप्टेंबर २०२६ ताडहदगाव, गोंदी, अंतरवाली, टेंभी, जांबसमर्थ १५ सप्टेंबर २०२६ सुखापुरी, रोहिलागड, तीर्थपुरी १६ सप्टेंबर २०२६ जामखेड, धनपिपरी, घनसावंगी या शिबिरांमध्ये नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व आपले सरकार सेवा केंद्र चालक उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करतील तसेच अर्ज पडताळणी व प्रमाणपत्र वितरणाची कार्यवाही करतील. अशी माहिती उपविभागीय अधिकारी श्री उमाकांत पारधी, तहसीलदार सोमेश मोहिते यांनी दिली.

# नेकनूर हद्दीत ५.१८ लाखांच्या मुद्देमालासह गुटखा व कार जप्त

**बीड -नेकनूर । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अवैध आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर पाऊल उचलले आहे. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मांजरसुंबा परिसरात परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने धडक कारवाई करत तब्बल ५ लाख १८ हजार ६२८ रुपयांच्या मुद्देमालासह अवैध गुटखा आणि स्विफ्ट डिझायर कार जप्त केली आहे. या प्रकरणी एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या सूचनेनुसार परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने ९ सप्टेंबर रोजी मांजरसुंबा परिसरात सापळा रचला. यावेळी एका संशयित मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कारची कसून तपासणी केली असता, त्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ बेकायदेशीररीत्या वाहतूक करताना आढळून आले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी पंचांसमक्ष २ लाख ६८ हजार ६२८ रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य साठा आणि वाहतुकीसाठी वापरलेली २ लाख ५० हजार रुपये किमतीची कार, असा एकूण ५ लाख १८ हजार ६२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी भाऊसाहेब राम पडुळे (रा. औरंगपूर, ता. जि. बीड) याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ सह भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४ व २७५ अन्वये नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या अन्नपदार्थांचे नमुने रासायनिक विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून पुढील तपास पोलीस करत आहेत. ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन डीवायएसपी भारत पांढरे व त्यांच्या पथकातील अधिकारी आणि अंमलदारांनी पार पाडली.

# शेतकऱ्याची पीक नुकसानाची कृषी विभागाकडून पाहणी

**अंबड । प्रतिनिधी**

**पावसाच्या खंडामुळे बाधित शेतकऱ्यांची पिक कापूस तूर सोयाबीन मुग उडीद नुकसान झालेली पिकाची जिल्हा कृषी कार्यालय व अंबड कृषी अधिकारी कडून पाहणी करण्यात आली. १० सप्टेंबर २०२६ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. गहिणीनाथ कापसे यांनी अंबड तालुक्यातील किंनगावाडी, नांदी व पारनेर गावांना भेट देऊन पावसाच्या खंडामुळे बाधित झालेल्या कापूस, सोयाबीन, तूर व आले पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली.**

पाहणीदरम्यान पिकांची खुंटलेली व असमान वाढ, पाने पिवळी पडणे तसेच संभाव्य उत्पादन घट याबाबत शेतकऱ्यांशी संवाद साधून माहिती घेण्यात आली. किंनगावाडी येथील सुंदरलाल हरिचंद नांगलोत यांच्या कापूस पिकाची व लालचंद रामलाल गांगे यांच्या आले पिकाची पाहणी करण्यात आली. तसेच नांदी येथील स. अब्दुल कादर स. अकबर यांच्या कापूस पिकाची आणि पारनेर येथील सोयाबीन तसेच अशोक मुळे यांच्या तूर व सोयाबीन पिकांची पाहणी करण्यात आली. संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी पिकांच्या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, नियमित क्षेत्रीय पाहणी करून वस्तुस्थितीदर्शक नोंदी अद्ययावत ठेवाव्यात आणि शेतकऱ्यांना परिस्थितीनुरूप आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करावे, अशा सूचना श्री. कापसे यांनी दिल्या. या क्षेत्रीय भेटीवेळी श्री. बाळासाहेब गंडे, तालुका कृषी अधिकारी, अंबड, संबंधित गावांतील सहाय्यक कृषी अधिकारी, शेतकरी व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पान १ वरून...

### आता शेतकरी कुटुंबातील सर्व

कक्षेत आणले आहे. त्यामुळे शेतीच्या कामात अपघात झाल्यास पात्र भूमिहीन शेतमजूर आणि त्यांच्या कायदेशीर वारसांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याशिवाय महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत 'महिला शेतकरी' म्हणून प्रमाणपत्र मिळालेल्या महिलांचाही या योजनेच्या लाभकक्षेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेती व्यवसायात प्रत्यक्ष योगदान देणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही अपघाताच्या प्रसंगी आर्थिक सुरक्षा मिळणार आहे. योजनेतील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकरी यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यांची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. १० ते ७५ वर्षे वयोगटातील आई-वडील, पती किंवा पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी, घटस्फोटीत मुलगी आणि विधवा मुलगी यांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी ७/१२ उताऱ्यावर नाव असलेल्या खातेदार शेतकरी आणि कुटुंबातील केवळ एका व्यक्तीपुरते, म्हणजे दोन व्यक्तींपुरते संरक्षण मर्यादित होते. आता ही मर्यादा दूर करून कुटुंबातील पात्र सदस्यांना संरक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांसाठी योजना सुरू राहणार असल्याने राज्यातील शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, अपघाताच्या संकटात संपूर्ण कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास लाभ**

शेतीची कामे करताना किंवा योजनेच्या निकषांनुसार अपघात झाल्याने संबंधित शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबातील पात्र सदस्याचा अपघाती मृत्यू झाल्यास अथवा अपंगत्व आल्यास सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळणार आहे. मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीचे कायदेशीर वारसदार लाभासाठी पात्र असतील. घरातील कर्त्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व झाल्यानंतर कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधनच बंद होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत कुटुंब आर्थिक अडचणीत सापडू नये आणि अपघातग्रस्त कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

---

### नियमाप्रमाणे एसइबीसी किंवा

निर्णयानुसार ३७७ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. सर्व नोंदींची यादी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लावण्यात आली आहे. याव्यतिरिक्त एसइबीसी नुसार ३५,९८१ प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. जात पडताळणी समितीकडे प्राप्त झालेल्या १,६६४ अर्जांपैकी १,०१६ जणांची पडताळणी पूर्ण करून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. नागरिकांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी येताना नोंदीचे आवश्यक पुरावे सोबत घेऊन यावेत, असे आवाहन करण्यात आले. नियमानुसार अर्ज केल्याशिवाय दाखले मिळणार नसून वंशावळ सिद्ध करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच नियमानुसार अर्जदारांना एसइबीसी किंवा कुणबी यापैकी एकाच पर्यायाची निवड करावी लागेल. या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, जालना जिल्ह्यासाठी जाधव यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या राज्यात जातीच्या आधारावर सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, आपले राज्य प्रगतिशील आणि मॉडर्न असल्याचे नमूद करत प्रशासनाने विकासावर भर देण्याचे आवाहन केले आहे. एका विकसित राज्यात जातीचा प्रश्न मागे ठेवून प्रगती आणि विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, तसेच आपली पहिली ओळख ही माणूस म्हणून असली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

---

### राष्ट्रीय पुरस्कार गुजरातमध्येच

दिसते आहे, अशी टीका मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी ट्विटरवर एक पोस्ट करत केली आहे. राज ठाकरे पुढे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, कधी ना कधी आता उरलो गुजरातपुरते अशी आपली गत होणार याची खात्रीच वाटत असल्यामुळे किमान तिकडे तरी माहात्म्य निर्माण करून घेऊ हा अट्टाहास सध्या केंद्रातील २ सत्ताधीशांचा दिसतो आहे. समजा पुरस्कार सोहळ्याचे स्थळ हलवायचे होते तर ते मुंबईत का नाही आणले? ज्या दादासाहेब फाळकेंनी भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घातला त्या राज्यात का नाही पुरस्कार वितरण ? किंवा देशात सगळ्यात जास्त सिनेमे महाराष्ट्र आणि दक्षिणेतील तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा येथे घडवले जातात यापैकी कुठल्या राज्यात हा सोहळा का नाही ? दक्षिणेत तर सिनेमांनी तिथल्या राजकारणाला आकार दिला आहे. गुजरातच का? असा सवालही राज यांनी केला आहे. पुढे आपल्या पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले की, या आधी देशात अनेक पंतप्रधान होऊन गेले, ज्यांची जन्मभूमी, कर्मभूमी असलेली राज्य त्यांनी ओढूनताणून मोठी करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. इथे कॉमनवेल्थ स्पर्धा गुजरातमध्ये, २०२३ च्या क्रिकेट वर्ल्ड कपचा अंतिम सामना गुजरातमध्ये, बाहेरून राष्ट्राध्यक्ष आले त्यांना गुजरातमध्ये घेऊन जायचे, गिफ्ट सिटी मुंबईतून गुजरातमध्ये न्यायची. या सगळ्यातून नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना काय दाखवायचे आहे की या देशाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा पाळणा हा गुजरातमध्ये हलला? आज जो देश उभा आहे तो कित्येक पिढ्यांच्या त्यागातून आणि देशातील प्रत्येक प्रांताच्या योगदानातून उभा आहे. यांना गुजरातपलीकडचा देश फक्त आठवतो त्या त्या राज्यात निवडणुका आल्या की. मग तिकडे जाऊन तिथले कपडे घालून भाषणं करून, माझं कसं या राज्याशी जुनं नातं आहे सांगून मतं मिळवायची एवढंच जमतं का? सध्याचे सत्ताधीश 'कलासक्त' नाहीत हे माहित आहे. कशाही निवडणुका जिंकायच्या ही एकमेव कला आणि त्यासाठी सगळ्यांवर सक्ती इतकाच यांचा 'कलासक्त'पणाशी संबंध असल्याची खोचक टीकाही त्यांनी केली. राज ठाकरे पुढे म्हणाले की, चित्रपटांशी संबंध म्हणाल तर वाट्टेल ते प्रचारकी सिनेमे बनवून घ्यायचे आणि त्यांना पुरस्कार द्यायला लावायचे इतकाच संबंध. या सगळ्याला दक्षिणेतील इतर सिनेमाप्रेमी राज्य कडाडून विरोध करतील, पण महाराष्ट्रात काहीही घडणार नाही. पण कलाकारांनी या विरोधात आवाज उठवायला हवा. मुद्दा केवाडिया किंवा इतर शहर हा नाही, देशाच्या राजधानीत या पुरस्काराची जी उज्वल परंपरा आहे ती का मोडली जात आहे यावर कलाकारांनी बोलले पाहिजे. नाहीतर उद्या गुजरातमधली स्थळं नसतील तर राष्ट्रीय पुरस्कार नाही असा फतवा पण हे लोकं काढतील. ऑस्कर सोहळा लॉस एंजलिसला होतो. ट्रम्प किंवा बुश किंवा ओबामा यांनी आपल्या राज्यात हा सोहळा नेला नाही. माझी गुजराती बांधवाना विनंती आहे की तुम्ही यांच्या नादी लागून उगाच वाहवत जाऊ नका. आपल्या भाषिक नेत्यांची सत्ता आहे याच्या ज्या गुदगुल्या होत आहेत, त्या सत्ता गेली की अस्वलाच्या गुदगुल्या होतील असा इशाराही यावेळी दिला.

---

### शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत

पेरण्या उशिरा झाल्या आणि आता १ महिन्यापासून पाऊस नाही. जे पेरले ते उगवले नाही व जे उगवले ते करपून गेले आहे. पावसाने दडी मारल्यानंतर कृत्रिम पाऊस पडण्याबाबत सरकारने पाऊल उचलायला पाहिजे होते पण सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. वीज गायब होत असल्याने ज्या ठिकाणी पाणी आहे तेथिल शेतकऱ्यांना पिकाला पाणीही देता येत नाही. सरकारने आतापासूनच टंचाईच्या अनुषंगाने नियोजन करावे. जनावरांना मिळणाऱ्या चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. एकही बळी जाऊ नये यासाठी सरकारने काळजी घेतली पाहिजे. केंद्र सरकारच्या निकषाने शेतकऱ्यांना पैसे द्यावेत, असेही म्हणाले.

---

### ज्या मातेच्या कुशीतून जन्मलो,

ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. युद्धात कमावले आणि तहात गमावले असे व्हायला नको, असेही त्यांनी स्पष्टपणे म्हटले. सरकारकडून जरांगे पाटलांनी आपलं उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन सातत्याने केले जात आहे. मात्र, जोपर्यंत सर्वच मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका पाटलांनी घेतली आहे. तर, १२ तारखेला मुंबईला जाणारच या मागणीवर ठाम असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या तथा दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्ट मत व्यक्त केले. जरांगे पाटील यांच्या शिवराळ भाषेबाबतही ज्योती मेटे यांनी वक्तव्य केले, गावगाडा चालला पाहिजे, जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे या मताची मी आहे. आम्ही जेव्हा नेतृत्व करतो तेव्हा आमच्यावर जबाबदारी असते. आमचे वर्तन जसे असेल तसेच अनुयायांचे देखील असते. ज्या मातेच्या कुशीतून आपण जन्म घेतो तिचे संस्कार सार्थ ठरतील असेच वर्तन आपले असले पाहिजे, असे मेटेंनी म्हटले.

---

### नाशिक कुंभमेळ्यासाठी

गेल्या महिन्यात पोलिसांनी कुंभमेळ्यासाठीच्या बनावट कामांच्या आदेशांशी संबंधित ३०५ कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आणला होता आणि अनेक जणांना अटक केली होती. नगरविकास विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, १,८०० कोटी रुपयांची ही रक्कम विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या एकूण ३,००० कोटी रुपयांच्या पुरवणी मागणीपैकी उर्वरित रक्कम आहे. यापूर्वी, कुंभमेळ्याशी संबंधित कामांसाठी विविध टप्प्यांवर २८३ कोटी, ७१७ कोटी, ५०१.४० कोटी, ३९६.६० कोटी आणि १,२०० कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. मंजूर निधीच्या वापरासाठी यात अटी घालण्यात आल्या आहेत त्यानुसार, ही रक्कम केवळ नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या मंजूर उद्दिष्टांमध्ये समाविष्ट असलेल्या कामांवरच खर्च केली जावी. वित्त विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि निकष, आर्थिक अधिकार प्रदान करण्याबाबतचे नियम तसेच इतर सूचना व अटींनुसारच या निधीचा वापर केला जावा. या नियमांच्या अंमलबजावणीची जबाबदारी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि नाशिकचे विभागीय आयुक्त यांच्यावर सोपवण्यात आली आहे. संबंधित कामांना सक्षम प्राधिकरणांकडून प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतरच संबंधित संस्थांना निधी वितरित केला जावा किंवा खर्च केला जावा, अशी अटही यात घालण्यात आली आहे. खर्च झाल्यानंतर, त्याचा विनियोग प्रमाणपत्र (युटिलायझेशन सर्टिफिकेट) त्वरित सरकारला सादर करणे आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी संबंधित अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून हा खर्च भागवला जाईल, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

---

### पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा

आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले तर शाडूच्या मातीपासून गणपती बाप्पांची मूर्ती घडवणारे हजारो विद्यार्थी हे आजचे वसुंधरा रक्षकच आहेत, अशा शब्दांत पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६' मध्ये ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये महाराष्ट्राच्या नावावर सुवर्ण अक्षरांनी नवा जागतिक विक्रम नोंदवला. या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ.नितीन इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, गणराया ही बुद्धीची देवता असून, आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो.

**गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड अन् पंकजाताईंचे कौतुक**

गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी निकाल जाहीर करताच मुख्यमंत्र्यांनी या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांची त्यांनी आपल्या भाषणात विशेष प्रशंसा करत कौतुक केले.

**मुख्यमंत्री व पंकजाताईंनी साकारली मूर्ती**

ढोल-ताशांच्या मंगल गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी स्वतः शाडू माती हातात घेऊन गणेशमूर्ती साकारली. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाला आपल्यासोबत मूर्ती घडवताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. आपण स्वतः करू शकतो तर प्रत्येक कुटुंबही पर्यावरणपूरक बाप्पा साकारू शकते, असा ठाम आणि प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश या उपक्रमाने संपूर्ण समाजाला दिला. शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि हजारो गणेशभक्तांच्या साक्षीने हा जागतिक विक्रम आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

---

### राज्यात काही जिल्ह्यांना वादळी

गडचिरोली जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. १२ सप्टेंबर रोजी धुळे, नाशिक घाट, नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस व विजांची शक्यता आहे. १३ सप्टेंबर रोजी पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. १४ सप्टेंबर रोजी नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. यलो अलर्ट असलेल्या जिल्ह्यांमध्ये नागरिकांनी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याच्या वेळी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

---

### भाजपचा 'ओबीसी डीएनए'

ओबीसींनाही डावलले गेले आहे, अशी विचित्र राजकीय कोंडी सध्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसींनी आपली ताकद दाखवण्यासाठी भाजपची साथ सोडत काँग्रेससोबत हातमिळवणी करावी, असा एक प्रमुख मतप्रवाह पुढे येत आहे. काँग्रेस पक्षच घटनात्मक चौकटीत ओबीसींना न्याय मिळवून देऊ शकतो, असा विश्वास अनेकांकडून व्यक्त केला जात आहे. त्याचबरोबर, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनीही सातत्याने ओबीसींच्या हिताची ठाम मांडणी केली आहे. आंबेडकर या प्रक्रियेत पूर्ण ताकदीने सोबत आले, तर राज्यात एक नवा राजकीय समतोल उभा राहू शकतो, अशीही चर्चा जोर धरत आहे. सत्ता टिकवण्यासाठी ओबीसींचा वापर करून नंतर त्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भाजपला राजकीय धडा शिकवण्यासाठी पक्षांतर आणि नव्या समीकरणांची जुळवाजुळव करणे अनिवार्य बनले आहे, अशा प्रतिक्रिया आता संपूर्ण राज्यातून उमटू लागल्या आहेत. ओबीसी आमचा डीएनए आहे असे म्हणत भाजपने वेळ साधून घेतली दुसरीकडे कोणाच्या ताटातलं देणार नाही म्हणत मराठा समाजालाही झुलवत ठेवले. अशा परिस्थितीत विखुरला गेला असला तरी मोठ्या संख्येने असलेल्या ओबीसी समाजाची मोठी नाराजी निर्माण होत असल्याने आणि भाजप ओबीसींना गृहीत धरत असल्यामुळे हा तोंड दाबून बुक्क्याचा मार ओबीसींना सहन करावा लागत आहे. ओबीसींनी काँग्रेस सारखा पर्याय निवडला तर भाजप वठणीवर यायला वेळ लागणार नाही, अशा देखील प्रतिक्रिया उमटत आहेत.

---

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात

### पिंपळेश्वर महादेव मंदिरात शनिवार-रविवारी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील श्रद्धास्थान असलेले आराध्य दैवत पुरातन श्री पिंपळेश्वर महादेव मंदिराचे कलशारोहण १२ व १३ सप्टेंबर रोजी होणार असून यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास आष्टी व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते ४.३० वाजेपर्यंत होमहवन, त्यानंतर सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत कलशारोहण कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर मंदिरापासून शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

तर रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते ११.३० वाजेपर्यंत रुद्राभिषेक, ५२ पानी व श्रृंगार पूजन करण्यात येणार आहे. हे धार्मिक विधी श्री. सद्गुरू ब्रह्मचारी विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, श्री क्षेत्र जहागीरदार मठ संस्थान नागनाथ देवस्थान, मानूर यांच्या शुभहस्ते पार पडणार आहेत. दुपारी १२.१५ ते १ वाजेपर्यंत कलशारोहण प्राणप्रतिष्ठा व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सद्भावना, सेवा, श्रद्धा आणि भक्तीचा उत्सव या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्याचा आष्टी व परिसरातील सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री पिंपळेश्वर देवस्थान समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### वडवणीत भक्तीचा जागर अन् पत्रकारितेचा गौरव
### रेणुकामाता संस्थानतर्फे पत्रकारांचा सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील निसर्गरम्य व हिरवाईने नटलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान येथे नुकताच आयोजित करण्यात आलेला श्री.शिवमहापुराण कथा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्याला वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी आपल्या माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देत कार्यक्रमाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात मोलाचे योगदान दिले. या योगदानाबध्दल दि.८ मंगळवार रोजी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचा श्री.रेणुकामाता संस्थानच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.



या श्री.शिवमहापुराण कथा सोहळ्याच्या माध्यमातून भाविकांना भगवान महादेवाच्या भक्तीचा, अध्यात्माचा आणि संस्कारांचा सुंदर अनुभव घेता आला. या धार्मिक कार्यक्रमाला भाविकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची माहिती तसेच सोहळ्याचे महत्त्व विविध माध्यमांच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचविण्यामध्ये वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पत्रकारांच्या प्रसिध्दीमुळे या धार्मिक सोहळ्याला भव्य स्वरुप प्राप्त झाले, असे आयोजकांनी यावेळी नमूद केले. याच पार्श्वभूमीवर श्री.रेणुकामाता संस्थान येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष सत्कार कार्यक्रमात वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रत्येक पत्रकार बांधवाला भगवान महादेवाची प्रतिमा, श्रीफळ व शाल देवून सन्मानित करण्यात आले. पत्रकार बांधवांनी दिलेल्या प्रसिध्दी, सहकार्य आणि सकारात्मक योगदानाबध्दल संस्थानच्या वतीने अण्णा महाराज दुटाळ यांनी आभार व्यक्त केले. यावेळी श्री.रेणुकामाता संस्थानचे प्रमुख अण्णा महाराज दुटाळ, शिवाजी दादा दुटाळ, राहुल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांच्यासह सर्व पत्रकार उपस्थित होते. तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनीही या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहून आयोजकांचे आभार स्विकारले. धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना माध्यमांच्या माध्यमातून योग्य प्रसिध्दी मिळाल्यास त्यांचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचतो. त्यामुळे श्री.रेणुकामाता संस्थानच्या वतीने पत्रकार बांधवांचा करण्यात आलेला हा सन्मान म्हणजे पत्रकारितेच्या कार्याबध्दल कृतज्ञता व्यक्त करणारा उपक्रम ठरला. या शिवमहापुराण कथा सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रसिध्दीच्या माध्यमातून नेहमीच सहकार्य करणाऱ्या वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचे रेणुकामाता संस्थानच्या वतीने आयोजक अण्णा महाराज दुटाळ व परिवाराने आभार मानले.

# हायवाची मनमानी पोलीसांच्या रडारवर

## हायवा पकडत वाहतूक शाखेने दिला नियमबाह्य वाहतुकीला इशारा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्त्यांवर सुरू असलेल्या हायवा आणि इतर अवजड वाहनांच्या दादागिरीला अखेर वाहतूक शाखेने लगाम घालण्यास सुरुवात केली आहे. बार्शी नाक्यावर जिल्हा वाहतूक शाखेने धडक कारवाई करत २ हायवा वाहने पकडली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अवजड वाहनचालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली असून, वाहतूक नियम धाब्यावर बसविणार्यांना अवजड वाहनांना जिल्हा वाहतुक शाखेने हा इशाराच दिला आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांची वाढलेली वर्दळ, बेदरकार वाहतूक आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे नागरिक त्रस्त आहेत. विशेषतः हायवा वाहनांच्या वाहतुकीमुळे अपघाताचा धोका वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम तीव्र केली आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच प्रोबेशनरी डी.वाय.एस.पी. भरत पांढरे यांच्या आदेशानुसार हा जनजागृतीपर तसेच वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पीएसआय संजय कुकलारे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या कर्मचार्यांनी बार्शी नाका परिसरात कारवाई केली. यावेळी नियमांचे उल्लंघन करणार्या हायवा वाहनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.



शहरातील रस्ते हे अवजड वाहनांच्या दादागिरीसाठी नसून सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आहेत. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणार्या चालकांविरोधात यापुढेही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे वाहतूक शाखेने स्पष्ट केले आहे. बार्शी रोडवरील कारवाईमुळे 'हायवा म्हणजे रस्त्याचा राजा' अशा थाटात वाहतूक करणार्यांना चांगलाच धक्का बसला आहे. वाहतूक शाखेच्या या कारवाईमुळे नियम मोडणार्या अवजड वाहनचालकांचे धाबे दणाणले असून, शहरातील वाहतूक शिस्तीला काही प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**हायवांची दहशत मोडून काढू- वैभव पाटील**

बेकायदेशीर हायवाचालक नियमांचे उल्लंघन करुन नागरिकांना त्रस्त करत आहेत. काही ठिकाणी अशी अवजड वाहनांचा नागरिकांना त्रास होत आहे तसेच अवजड वाहनांसह सर्वच वाहनचालकांनी आपल्या वाहनांचे कागदपत्रे सोबत ठेवावेत तसेच हायवा मालकांनी आपल्या हायवावर नंबरप्लेट ठेवाव्यात अन्यथा कडक कायदेशीर कारवाई करु असा इशारा जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिला आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १६ सप्टेंबरला शेतकरी हलगी बजाव आंदोलन

## दुष्काळ नुकसान भरपाई, पिक विम्यासाठी आंदोलनात सहभागी व्हा -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

दुष्काळा मुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून सोयाबीन, कापूस व तूर पिकांचा अक्षरशः धुराळा झाला आहे. तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी,मागील अतिवृष्टीतील घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा तसेच २०२० सालचा थकीत पीकविमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य 'हलगी बजाव' शेतकरी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केले आहे.



शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्ह्यातील गावोगावी शेतकरी बैठका घेऊन शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांबाबत जागृत करण्यात येत आहे. नाळवंडी येथे मोर्चाची पहिली बैठक घेण्यात आली. त्यानंतर राक्षसभुवन, कुक्कडगाव, पिंपळगाव मांजरा, म्हाळसापूर, ईट, गंगनाथवाडी, उमरद खालसा आणि वाकनाथपूर येथे शेतकरी बैठका घेण्यात आल्या.

वाकनाथपूर येथे झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता 'हलगी बजाव' आंदोलन करण्याचा निर्धार केला. पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, मागील अतिवृष्टीतील घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा द्यावा, २०२० सालचा थकीत पीकविमा तात्काळ जमा करावा आणि जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

या मागण्यांकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, अशोकराव येडे, बाळासाहेब मोरे, कवी ज्ञानेश्वर राऊत, हनुमान घोडके, अर्जुन सोनवणे, रामधन जमाले, भास्कर खाकरे, महादेव खाकरे, महादेव घोडके, प्रल्हाद दर्पे, प्रल्हाद खाकरे, शिवाजी कानडे, अभिमान खाकरे, संतोष घाडगे, शेख आलेख, शेख कबीर, विक्रम घाडगे, दिगंबर खाकरे, दिलीप घाडगे, विक्रम खाकरे यांच्यासह आदी शेतकरी उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### परमेश्वर सातपुते यांची

निवेदने देणे, शेतकऱ्यांच्या अडचणी थेट जाणून घेण्यासाठी त्यांच्या बांधावर पोहोचणे, तसेच संकटाच्या काळात गरजू शेतकऱ्यांना शक्य ती मदत करण्याचे काम त्यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ राजकीय मुद्दा म्हणून न पाहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांमध्ये जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेण्याची त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठीही सातपुते सर यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.समाजातील वंचित आणि गरजू घटकांना न्याय मिळावा, त्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांना आवश्यक ती मदत मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे जनतेमध्ये केवळ राजकीय पदाधिकारी म्हणून नव्हे, तर संकटाच्या काळात धावून जाणारा आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी उभा राहणारा कार्यकर्ता अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून सातपुते सर शिवसेनेच्या विचारांशी एकनिष्ठ राहून पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत. तळागाळातील शिवसैनिक, पदाधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवत त्यांनी पक्षाच्या विविध आंदोलनांमध्ये, उपक्रमांमध्ये आणि सामाजिक प्रश्नांवरील संघर्षात सक्रिय भूमिका बजावली आहे. प्रभावी वक्तृत्व, संघटन कौशल्य, आक्रमक व अभ्यासपूर्ण भूमिका आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविण्याची भूमिका यामुळे त्यांनी पक्षात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

बीड जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी ग्रामीण भागातील शिवसैनिकांना संघटित करण्यासोबतच पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या दीर्घकाळच्या कार्याची आणि संघटनात्मक अनुभवाची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी आता त्यांच्यावर लातूर जिल्हा संपर्कप्रमुखपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. लातूर लोकसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढविणे, नवीन पदाधिकारी व शिवसैनिकांना पक्षाशी जोडणे, तळागाळातील संघटन अधिक मजबूत करणे तसेच पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली व्यापक संघटनात्मक कामाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध निवडणुका होणार असल्याने सातपुते सर यांची लातूर जिल्हा संपर्कप्रमुखपदी झालेली नियुक्ती पक्षाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्या संघटन कौशल्यासोबतच शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेमध्ये केलेल्या प्रदीर्घ कामाचा लातूर जिल्ह्यातील पक्षबांधणीसाठी मोठा फायदा होणार असल्याची भावना शिवसैनिकांमधून व्यक्त होत आहे. लातूर जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा अधिक जोमाने फडकविण्यासाठी संघटन विस्ताराला प्राधान्य देत सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या कामाला नवी दिशा, नवा जोम आणि नवी गती मिळेल अशी शिवसैनिकांमध्ये भावना आहे..!

### बैलपोळ्यानिमित्त आमदार

शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि शेतकऱ्यांच्या कष्टाला भरघोस यश मिळावे,' अशी मनोभावे प्रार्थना आमदार सुरेश धस यांनी यावेळी केली. बैलपोळ्याच्या निमित्ताने शेतकरी आणि त्याचा जिवाभावाचा साथीदार असलेल्या सर्जा-राजामधील अतूट नाते पुन्हा एकदा अधोरेखित झाले. शेतकऱ्याच्या सुख-दुःखात साथ देणाऱ्या या मुक्या जीवाप्रती कृतज्ञता व्यक्त करत धस कुटुंबीयांनी पारंपरिक पद्धतीने पोळा सण साजरा केला.

### माजलगावात मानाचा

प्रमुख मार्गांवर बैलपोळ्याचा उत्साह ओसंडून वाहत होता.

पिढ्यान्?पिढ्या जपलेल्या परंपरेला यंदाही मान

माजलगाव शहरातील शेटे कुटुंबीयांकडे बैलपोळ्याच्या पहिल्या मिरवणुकीचा मान पिढ्यान्?पिढ्या चालत आला आहे. या मानाच्या मिरवणुकीनंतरच शहरातील इतर शेतकरी आपल्या बैलजोड्यांच्या मिरवणुका काढतात. त्यामुळे शेटे कुटुंबीयांची ही मिरवणूक माजलगावच्या बैलपोळ्याचे प्रमुख आकर्षण ठरते. रात्री उशिरापर्यंत शहरात बैलपोळ्याच्या मिरवणुका उत्साहात सुरू होत्या.

### दुष्काळाच्या सावटाखाली बैलपोळा

पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून त्यांना खाऊ घातला. मात्र, आधुनिक शेतीकडे वाढलेला कल, यांत्रिकीकरण आणि वाढता खर्च यामुळे बैलजोड्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे युसूफवडगावातही यंदा मोजक्या हौशी शेतकऱ्यांकडेच बैलजोड्या पाहावयास मिळाल्या. दुष्काळाचे संकट असतानाही आपल्या लाडक्या सर्जा-राजाप्रती असलेला शेतकऱ्यांचा जिव्हाळा आणि परंपरेवरील प्रेम यानिमित्ताने दिसून आले.

### पोलीस अधीक्षकांचा दणका

तीन जिल्ह्यांतून हद्दपार करण्याचे आदेश दिले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकराम आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली धारूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. बी. वाघमोडे, राजेंद्र घुगे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोउपनि अभिमन्यू औताडे आणि पोलीस शिपाई बिभीषण चव्हाण यांनी केली.

### गेवराई येथे शिवसेना

चांद भाई शेख, कृष्णा चव्हाण, रफिक बागवान, मुनाफ पवार, मुस्तफा शेख, रईस टेलर, मुजीफ शहा आणि महेश पवार यांच्यासह गेवराई शहरातील व तालुक्यातील इतर अनेक सक्रिय शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी, उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. शहर प्रमुख राजू भाई शेख यांच्या कार्यालयातील या बैठकीमुळे गेवराईतील शिवसैनिकांमध्ये एक नवा उत्साह पाहायला मिळाला.

## तांत्रिक त्रुटींचा फटका; ग्राम रोजगार सेवकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

बीड । प्रतिनिधी

मनरेगा योजनेतील तांत्रिक त्रुटी, प्रणालीतील अडचणी आणि त्यातून ग्राम रोजगार सेवकांवर होणारे आरोप व हल्ले याविरोधात बीड जिल्ह्यातील ग्राम रोजगार सेवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले. विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर करण्यात आले.




मनरेगा योजनेचे '--'मध्ये रूपांतर झाले असले तरी अंमलबजावणीच्या पातळीवरील अडचणी कायम असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. ने विकसित केलेल्या '' ॲपमधील तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या, लोकेशन तसेच ई-केवायसी नोंदणीतील त्रुटींमुळे मजुरांची हजेरी वेळेत नोंदविता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींची जबाबदारी रोजगार सेवकांवर टाकून त्यांच्यावर कारवाई केली जात असल्याचा आरोप करण्यात आला.

जिल्ह्यात १५ ते २० ग्राम रोजगार सेवकांवर हल्ले झाले असून काहींवर गुन्हे दाखल करून कामावरून हटविण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. त्यामुळे हल्लेखोरांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रणालीतील त्रुटी दूर कराव्यात, बाहेरील ॲपचा शिरकाव थांबवावा, कुशल कामाच्या देयकांसाठी स्वतंत्र जबाबदार व्यक्ती नेमावी, अतिरिक्त रोजगार सेवक कमी करावेत आणि ई-केवायसी पूर्ण केलेल्यांना सेवेत पूर्ववत घ्यावे, या मागण्या करण्यात आल्या. अपील केलेली प्रकरणे निकाली काढून निष्पक्ष चौकशीशिवाय एकतर्फी कारवाई करू नये, अशीही मागणी आहे. मागण्या मान्य न झाल्यास 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन' (ग्रामीण) अंतर्गत धरणे आंदोलन, निदर्शने व तीव्र लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याचा इशारा हमी ग्राम रोजगार सहायक संघटना, जिल्हा बीड यांनी दिला आहे.

## माजलगाव शहरात गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन
## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचा नवीन उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

महालक्ष्मी सणानिमित्त प्रत्येक हिंदू कुटुंबात गौरी पूजन मोठ्या भक्तिभावाने केले जाते. घरोघरी आकर्षक आरास व मनमोहक सजावट करून हा सण उत्साह व आनंदाने साजरा केला जातो, हेच आनंदी क्षण टिपण्यासाठी आणि महिलांच्या कलेला वाव देण्यासाठी फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज माजलगाव च्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या वर्षी ही स्पर्धा माजलगाव शहरापुरतीच मर्यादित असणार आहे. शहरातील गृहिणी व कुटुंबांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने प्राचार्या सारिका बजाज व सौ.माया चांडक यांनी केले आहे.

स्पर्धेचे स्वरूप

स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १६ सप्टेंबर २०२६ असून स्पर्धेची तारीख २० सप्टेंबर २०२६ रोजी असेल. स्पर्धेचे नियम व अटी नुसार ही स्पर्धा फक्त माजलगाव शहरापुरती मर्यादित असेल. सजावटी नंतर स्पर्धेसाठी पाठवलेल्या कुठल्याही फोटोला अथवा व्हिडीओ ला फिल्टर किंवा (ए.आय.) तंत्रज्ञानाचा वापर केल्यास स्पर्धक बाद केला जाईल. स्पर्धेत २ फोटो व २ मिनिटांचा नॉर्मल व्हिडिओ पाठवावा लागेल.स्पर्धेसाठी परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.परिक्षक हे स्वतः आपल्या घरी येऊन सर्व सजावटीची पाहणी करतील.स्पर्धेसाठी नोंदणी शुल्क फक्त १००/- रुपये ठेवण्यात आले असून,नोंदणी साठी दिलेल्या संपर्क नंबर वर चौकशी करून स्पर्धकास नोंदणी शुल्क भरता येईल.या स्पर्धेत सहभागी स्पर्धकातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात येईल आणि विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी कृष्णा सोळंके व ज्योती बनसोडे यांच्या व्हाट्सअप मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२३० दिनांक-०९/०९/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती **बळीराम बाबुलाल जाधव** रा.खेडगाव खु. ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | श्लोक बळीराम जाधव | मुलगा | २७/०९/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शिक्षणाबरोबर समाजाची चिंता करणारे सिद्धेश्वर महाविद्यालय - प्रा. उत्तमराव कांदे

माजलगाव । प्रतिनिधी

आजच्या सोशल मीडियाच्या गुंतगुंतीच्या वातावरणात विद्यार्थ्यांची गुणात्मक संस्कारक्षम करिअर उंचावण्यासाठी त्याच्या स्वतःच्या मेहनती सोबत पालक व शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन हा महत्त्वपूर्ण आहे.असे प्रतिपादन वैद्यनाथ महाविद्यालयाचे समन्वयक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जालना विभाग संघचालक प्रा. उत्तमराव कांदे यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या पालक मेळाव्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



याप्रसंगी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून भा.शि.प्र संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे,अध्यक्ष म्हणून भा.शि.प्र संस्थेचे केंद्रीय सदस्य व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, प्राचार्य प्रो.डॉ.मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री, मेळाव्याचे समन्वयक प्रा. चिंतामण दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. कांदे म्हणाले की, पालकांशी हितगुज साधताना मुलांना केवळ शिस्तीचा बडगा उगारून जमणार नाही तर त्याच्याशी मैत्रीची नाते जपले तर ते अधिक मोकळेपणाने संवाद साधतात. उद्घाटन पर मनोगत व्यक्त करताना संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे म्हणाले की, पालकांनी स्वतः मोबाईलचा वापर मर्यादित करावा तर त्याचे अनुकरण मुले करतील. कुटुंब म्हणून मोबाईल वापराची मर्यादा ठरवली तर मुलं अभ्यासाला लागतील. दहावी नंतरची ही दोन वर्ष प्रत्येक पाल्याच्या मानसिक, शारीरिक जडणघडणीसाठी महत्त्वाचे आहेत म्हणूनच मोबाईलचा वापर विद्यार्थ्यां सोबतच कुटुंबानेच मुळात तो कमी करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य प्रो. डॉ.मुकुंद देवर्षी यांनी पालक मेळावा आयोजनामागची मुख्य भूमिका स्पष्ट केली आणि पालकांनी स्वतः बोलते झाले तर त्यामागील उद्देश हा जास्त सफल होईल असे म्हटले. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड म्हणाले की, नवीन काळाप्रमाणे आता सर्वांनी कुटुंबात वावरताना 'मोबाईल पार्किंग 'या संकल्पनेचा वापर करावा म्हणजे कुटुंबात मुख्य संवाद वाढून इतर अनेक समस्या सुटतील.मेळाव्याच्या दुसऱ्या सत्रात शिक्षकांचा परिचय पालकांसमवेत झाला तसेच श्री थावरे, शिवराम होके या पालकांनी मनोगत व्यक्त केले.उपप्राचार्य साबळे यांनी निवेदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर व आभार प्रा.राघवेंद्र मुळी यांनी मानले . कार्यक्रमाची सांगता सामूहिक शांती मंत्राने झाली. या पालक मेळाव्यासाठी बहुसंख्य माता व पिता पालक यांची उपस्थिती होती.




# यंदा साखर उतारा घटण्याची शक्यता!

## साखर हंगाम लवकर सुरू केल्यास होऊ शकतो परिणामः राजु शेट्टींचा इशारा

पुणे : यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ऊस गाळप हंगाम २०२६-२७ चे धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. ९ सप्टेंबर) मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मंत्री समितीची बैठक झाली. यावेळी यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. पण स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गाळप हंगाम लवकर सुरु करण्यास विरोध दर्शवला आहे. यामुळे साखर उतारा कमी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

मागील गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरु करण्यात आला होता. पण साखरेच्या वाढत्या दराच्या पार्श्वभूमीवर यंदाचा (२०२६-२७) गाळप हंगाम लवकर सुरु करण्यासाठी केंद्र सरकारने तगादा लावला होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गाळप हंगाम लवकर सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीत राज्यातील ऊस उपलब्धता, गाळप हंगामाचे नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना देण्यात येणारा ऊस दर तसेच साखर कारखान्यांसमोरील विविध आर्थिक व तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यात आली. याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताच्या दृष्टीने समतोल साधून आगामी गाळप हंगामाचे नियोजन करण्यात आले असल्याचे



सरकारकडून सांगण्यात आले आहे. साखर उद्योगासंदर्भातील केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या विषयांवरही बैठकीत चर्चा झाली. साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करणे, इथेनॉलचा दर वाढवणे तसेच इथेनॉल प्रकल्पांना प्रलंबित व्याज अनुदान तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी केंद्रकडे शिफारस करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.गाळप हंगाम लवकर सुरु करण्याच्या निर्णयावर शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्य सरकारने १५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. पण हा निर्णय घेत असताना सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्याचा विचार केला का? असा सवाल शेट्टी यांनी केला आहे.

१५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरु केल्यामुळे पहिल्या महिन्यात साखर उतारा जवळपास सव्वा टक्के (रिकव्हरी) घटणार आहे. सव्वा टक्के म्हणजे सव्वापाचशे ते सहाशे रुपये इतका मोठा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसेल. रिकव्हरी कमी झाली की साखर कमी तयार होईल आणि मग त्याचा ऊस दरावर परिणाम होईल. तसेच याचा पुढच्या वर्षीच्या ऊस दरावर परिणाम होणार आहे. यामुळे वर्षातील सरासरी रिकव्हरी खाली येऊन एफआरपी खाली येईल, असे शेट्टी यांनी निदर्शनास आणून दिले आहे. देशात साखरेचा साठा शिल्लक नाही म्हणून हा निर्णय घेतला आहे.

१५ ऑक्टोबरपासून जबरदस्तीने कारखाने सुरु केले तर यावर्षी किमान २० लाख टन साखरेचे उत्पादन घटणार आहे. हे सरकारने लक्षात घ्यावे, असे त्यांनी नमूद केले आहे.१५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या काळामध्ये टनाला ५०० रुपये थेट अनुदान केंद्र अथवा राज्य सरकारने देण्याची भूमिका घ्यावी अन्यथा १५ ऑक्टोबरला कारखाने चालू होणार नाहीत. तुम्हाला कुठून साखर आणायची असेल तेथून आणा, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# सप्टेंबर महिन्यात या भाज्यांचे घेता येईल उत्पादन



सप्टेंबर महिन्यात हवामानात होणाऱ्या बदलांमुळे अनेक प्रकारच्या भाज्यांची लागवड करण्यासाठी हा काळ अत्यंत उपयुक्त मानला जातो. या महिन्यात पेरणी केल्यास हिवाळ्याच्या सुरुवातीलाच तुम्हाला घरच्या घरी ताजी आणि सेंद्रिय भाजीपाला उपलब्ध होतो.

सप्टेंबरमध्ये सहज लावण्यासाठी उत्तम भाज्या : पालक : सप्टेंबर महिन्यात पालकाची लागवड करणे अतिशय सोपे असते. ही भाजी ३० ते ४० दिवसांत काढणीस तयार होते. मेथी: हिवाळ्यातील लोकप्रिय भाजी असून ती कुंडीत किंवा बागेत सहज उगवते.मुळा : मुळ्याची पेरणी सप्टेंबरमध्ये केल्यास हिवाळ्यात पांढरे आणि रसाळ मुळे तयार होतात.गाजर : लाल आणि गोड गाजराच्या पेरणीसाठी सप्टेंबर-ऑक्टोबर हा सर्वोत्तम काळ आहे.मटार / मटारच्या शेंगा : हिवाळ्यात ताज्या मटारचा आस्वाद घेण्यासाठी सप्टेंबरच्या उत्तरार्धात मटारची पेरणी सुरू करता येते.कोबी आणि फ्लॉवर : या भाज्यांची रोपे (डरश्रिळपसी) या महिन्यात लावून हिवाळ्यात मोठे आणि ताजे गड्डे मिळवता येतात.मेथी, कोथिंबीर आणि शेपू : कोथिंबीर आणि शेपू या पालेभाज्यांची लागवडही या काळात उत्तम प्रकारे होते.

लागवडीसाठी काही महत्त्वाच्या टिप्स : कुंडीची किंवा मातीची निवड: पाण्याचा योग्य निचरा होणारी माती वापरावी. मातीत ५०% शेतमाती आणि ५०% गांडूळ खत किंवा वर्मीकंपोस्ट मिसळावे. सूर्यप्रकाश: रोपांना रोज किमान ४ ते ५ तास चांगला सूर्यप्रकाश मिळेल अशा ठिकाणी कुंडी ठेवावी. पाणी देणे: मातीतील ओलावा पाहूनच पाणी द्यावे; जास्त पाणी दिल्यास मुळे सडू शकतात.

# पावसाळ्यात जनावरांची अशी घ्या काळजी

पावसाळा सुरू झाला की शेतकऱ्यांसोबतच पशुपालकांसाठीही आव्हाने वाढतात. या काळात जास्त आर्द्रता, चिखल, डास-माशांचा प्रादुर्भाव आणि दूषित पाण्यामुळे जनावरांना विविध आजार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे दूध उत्पादन कमी होणे, जनावरांची तब्येत बिघडणे आणि आर्थिक नुकसान होऊ शकते. योग्य काळजी घेतल्यास ही जोखीम मोठ्या प्रमाणात टाळता येते. पावसाळ्यात जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी गोठा स्वच्छ ठेवणे, योग्य आहार, स्वच्छ पाणी, लसीकरण आणि खुरांची काळजी यासह १० महत्त्वाच्या पशुपालन टिप्स जाणून घ्या.

पावसाळ्यात जनावरांची काळजी घेताना या गोष्टी लक्षात ठेवा

१. गोठा स्वच्छ आणि कोरडा ठेवागोठ्यात पाणी साचू देऊ नका. ओलसर वातावरणामुळे जंतुसंसर्ग, खुरांचे आजार आणि त्वचेचे विकार होऊ शकतात. २. स्वच्छ पिण्याचे पाणी द्याजनावरांना नेहमी स्वच्छ आणि ताजे पाणी द्या. दूषित पाणी पिल्यास अतिसार, ताप आणि इतर संसर्गजन्य आजार होऊ शकतात.

३. संतुलित आणि ताजा चारा द्याओला, कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा देऊ नका. त्यामुळे पचनाचे विकार आणि विषबाधेचा धोका वाढतो.

४. डास आणि माशांपासून संरक्षण करागोठ्याभोवती स्वच्छता ठेवा. आवश्यक असल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने कीटकनाशक फवारणी करा.



५. लसीकरण वेळेवर करून घ्यालम्पी, एफएमडी (तोंड-खुर रोग), एचएस आणि बीक्यू यांसारख्या रोगांपासून संरक्षणासाठी वेळेवर लसीकरण महत्त्वाचे आहे. ६. खुरांची नियमित स्वच्छता करा : चिखलात जास्त वेळ राहिल्याने खुरांना संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे खुर स्वच्छ करून कोरडे ठेवणे आवश्यक आहे. ७. पावसात भिजल्यास शरीर कोरडे करा : जनावरे पूर्णपणे भिजल्यास स्वच्छ कापडाने पुसून कोरड्या जागेत बांधा.

८. खनिज मिश्रण आणि पोषक आहार द्या : रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी पशुवैद्यांच्या सल्ल्याने मिनरल मिक्सचर आणि आवश्यक पूरक आहार द्या.

९. आजाराची लक्षणे दिसताच उपचार करा : भूक न लागणे, ताप, खोकला, जुलाब किंवा दूध कमी होणे यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित पशुवैद्यांचा सल्ला घ्या. १०. गोठ्यात योग्य हवेशीर व्यवस्था ठेवा आर्द्रता कमी राहण्यासाठी गोठ्यात हवा खेळती राहील याची काळजी घ्या.

पावसाळ्यात थोडीशी अतिरिक्त काळजी घेतल्यास जनावरे निरोगी राहतात, दूध उत्पादनात घट होत नाही आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता येते. स्वच्छता, संतुलित आहार, वेळेवर लसीकरण आणि पशुवैद्यांचा सल्ला हीच निरोगी पशुपालनाची गुरुकिल्ली आहे.

# पत्ताकोबी लागवडीची संपूर्ण माहिती घेतल्यास मिळतो चांगला नफा

पत्ताकोबी हे थंड हवामानात येणारे आणि बाजारात बाराही महिने मागणी असणारे एक महत्त्वाचे नगदी पीक आहे. योग्य नियोजन आणि आधुनिक पद्धतीचा वापर केल्यास पत्ताकोबी लागवडीतून भरपूर नफा मिळू शकतो. खाली पत्ताकोबी लागवडीची संपूर्ण माहिती सविस्तर दिली आहे. १. हवामान आणि जमीन : हवामान: पत्ताकोबीसाठी थंड आणि थोडे दमट हवामान उत्तम मानले जाते. कंद चांगला पोसण्यासाठी १५ तापमान सर्वात योग्य असते. जमीन: मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.० ते ६.५ च्या दरम्यान असावा.

२. लागवडीचा हंगाम

पत्ताकोबीची लागवड वर्षभरात तीनही हंगामात करता येते: खरीप (पावसाळी): जून ते जुलै (रोपवाटिका) - ऑगस्टमध्ये पुनर्लागवड.

रब्बी (हिवाळी): सप्टेंबर ते ऑक्टोबर (रोपवाटिका) - नोव्हेंबरमध्ये पुनर्लागवड. (या हंगामात उत्पादन सर्वात जास्त मिळते)

उन्हाळी: जानेवारी ते फेब्रुवारी (रोपवाटिका).

३. प्रमुख आणि सुधारित जाती : लवकर तयार होणाऱ्या जाती: 'गोल्डन एकर', 'प्राइड ऑफ इंडिया', 'पुसा अगेती'.

उशिरा तयार होणाऱ्या जाती: 'पुसा ड्रमहेड'. हायब्रीड (संकरित) जाती: 'बजरंग', 'क्रेस्ट', 'नथ ४०१', 'हरिराणी'. (हायब्रीड जातींचे कंद कडक आणि लांब अंतराच्या वाहतुकीसाठी उत्तम असतात.)



४. रोपवाटिका आणि बियाण्याचे प्रमाण : बियाण्याचे प्रमाण: प्रति हेक्टरी साधारणपणे ६०० ते ७०० ग्रॅम (सुधारित जातींसाठी) किंवा ३५० ते ४०० ग्रॅम (संकरित जातींसाठी) बियाणे लागते. रोप तयार करणे: गादीवाफ्यावर बियाणे पेरून रोप तयार करावे. रोप उपटण्यापूर्वी गादीवाफ्याला हलके पाणी द्यावे. रोप साधारण ४ ते ५ आठवड्यांचे (४ ते ५ पानांवर आले की) पुनर्लागवडीसाठी तयार होते.

५. लागवड पद्धत : अंतर: लागवड करताना दोन ओळींमधील आणि दोन रोपांमधील अंतर जातीनुसार ठेवावे: लवकर तयार होणाऱ्या जाती: ४५ सेमी ह्न ४५ सेमी : उशिरा तयार होणाऱ्या जाती किंवा हायब्रीड: ६० सेमी ह्न ४५ सेमी पद्धत: रोपांची लागवड सरी-वरंब्यावर किंवा सपाट वाफ्यावर संध्याकाळच्या वेळी करावी, जेणेकरून रोपे लगेच रुजतात. लागवडीनंतर लगेच हलके पाणी द्यावे.

६. खत आणि पाणी व्यवस्थापन : खत व्यवस्थापन: जमीन तयार करताना हेक्टरी २० ते २५ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.

रासायनिक खतांमध्ये प्रति हेक्टरी ८० ते १०० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश द्यावे. नत्राचा अर्धा डोस आणि स्फुरद-पालाशचा पूर्ण डोस लागवडीच्या वेळी द्यावा. उर्वरित नत्राचा डोस लागवडीनंतर १ महिन्याने द्यावा. पाणी व्यवस्थापन: पत्ताकोबीला नियमित पाण्याचा पुरवठा आवश्यक असतो. हिवाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने, तर उन्हाळ्यात ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. कंद धरताना पाण्याच्या पाळीत अजिबात खंड पडू देऊ नये, अन्यथा कंद फाटतात.

७. रोग व कीड नियंत्रण : किडी: कोबीवर प्रामुख्याने 'पानावरील पांढरी अळी' आणि मावा चा प्रादुर्भाव होतो. यासाठी निंबोळी अर्काची किंवा शिफारशीत कीटकनाशकाची (उदा. सायपरमेथ्रीन किंवा स्पिनोसॅड) फवारणी करावी. रोग: 'काळा कुजवा' आणि 'मर रोग' हे मुख्य रोग आहेत. यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे.

८. काढणी आणि उत्पादन : जातीनुसार लागवडीनंतर ६० ते ९० दिवसांत कोबीचे कंद काढणीस तयार होतात. कंद हाताने दाबून पहावा; तो घट्ट आणि कडक लागल्यास काढणी करावी. कंद काढताना त्याला खाली २-३ पाने तशीच ठेवावीत, ज्यामुळे वाहतुकीत कंद खराब होत नाही. उत्पादन: सुधारित जातींपासून हेक्टरी २० ते २५ टन आणि संकरित (हायब्रीड) जातींपासून ३५ ते ५० टन पर्यंत उत्पादन मिळू शकते.




### महत्वाच्या घटना

१२९७ : स्टर्लिंग ब्रिजच्या लढाईत स्कॉटिश सैन्याने इंग्लंडचा पराभव.
१७७३ : बेंजामिन फ्रँकलिनने रुल्स बाय विच ए ग्रेट एम्पायर मे बी रिड्युस्ड टू ए स्मॉल वन हा निबंध प्रकाशित केला.
१७९२ : होप हिरा चोरला गेला.
१८९३ : स्वामी विवेकानंद यांनी जागतिक सर्वधर्म परिषदेसमोर आपले गाजलेले भाषण केले.
१९०६ : म. गांधींनी द. आफ्रिकेत सत्याग्रह हा शब्द पहिल्यांदा वापरला.
१९१९ : अमेरिकन सैन्याने होंडुरास ताब्यात घेतले.
१९४१ : अमेरिकेने पेंटागॉन बांधायला सुरुवात केली.
१९४२ : आझाद हिंद सेनेने जन गण मन राष्ट्रगीत म्हणून गायले.
१९६१ : 'विश्व प्रकृती निधी' ची स्थापना झाली.
१९६५ : भारत पाक युद्ध भारतीय सैन्याने लाहोरजवळील बुर्की गाव ताब्यात घेतले.
१९७२ : नाट्यमंदार निर्मित आणि प्रा. मधुकर तोरडमल लिखित व दिग्दर्शित 'तरुण तुर्क, म्हातारे अर्क' या नाटकाचा पहिला प्रयोग इचलकरंजी येथील डेक्कन स्पिनिंग मिलच्या गणेशोत्सवात झाला. थिएटरमधील पहिला प्रयोग ५ आक्टोबर १९७२ रोजी मुंबईच्या रविंद्र नाट्यमंदिरात झाला.
२००१ : अमेरिकेत ठिकठिकाणी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात २९९६ लोक ठार झाले. यावेळी अध्यक्ष जॉर्ज बुश यांना तातडीने अज्ञातस्थळी हलवले गेले. अमेरिकेचे जर एखाद्या देशाशी अणूयुद्ध झालेच तर राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षिततेसाठी अमेरिकेत ७५ हून अधिक ठिकाणी जमिनीखाली विषेश व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. पेंटॅगॉन या अमेरिकेच्या लष्करी मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यात सुमारे दहा कोटी डॉलरचे नुकसान झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : जर्मन संशोधक कार्ल झाइस यांचा जन्म.
१८६२ : इंग्लिश लेखक ओ. हेन्री यांचा जन्म.
१८८४ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी सुधीमय प्रामाणिक यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑक्टोबर १९७४)
१८८५ : डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार, टीकाकार आणि चित्रकार (मृत्यू: २ मार्च १९३०)
१८८८ : अर्टिजेंनाचे राष्ट्राध्यक्ष दॉमिंगो फॉस्तिनो सार्मियेंतो यांचे निधन.
१८९५ : आचार्य विनोबा भावे भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य, भारतरत्न १९८३ मरणोत्तर, १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या केलेल्या आंदोलनात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. भूदान यज्ञात विनोबांनी देशभर पदयात्रा केली. (मृत्यू: १५ नोव्हेंबर १९८२)
१९०१ : आत्माराम रावजी देशपांडे तथा 'कवी अनिल' साहित्य अकादमी पारितोषिक विजेते, साहित्य संमेलनाचे व साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, 'प्रेम आणि जीवन', ' भग्नमूर्ती', 'चिनी मुलास', 'निर्वासित' ही खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. प्रौढ शिक्षणविषयक कार्यासाठी त्यांना नेहरू पारितोषिक मिळाले होते. (मृत्यू: ८ मे १९८२)
१९११ : भारतीय क्रिकेटपटू लाला अमरनाथ यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २०००)
१९१५ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (मृत्यू: २९ मार्च १९९७)
१९१७ : फर्डिनांड मार्कोस फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २८ सप्टेंबर १९८९)
१९३९ : ऍडॉब सिस्टम चे संस्थापक चार्ल्स गेशेके यांचा जन्म.
१९८२ : तामिळ चित्रपट अभिनेत्री श्रीया शरण यांचा जन्म.
१९८३ : विनोबा भावे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.
१९७६ : भारतीय क्रिकेटर मुरली कार्तिक यांचा जन्म.
१९९७ : नासाचे मार्सग्लोबल सर्व्हेयर हे अंतराळयान मंगळावर पोहोचले.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२१ : सुब्रम्हण्यम भारती तामिळ साहित्यिक (जन्म: ११ डिसेंबर १८८२)
१९४८ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल (जन्म: २५ डिसेंबर १८७६)
१९६४ : गजानन माधव मुक्तिबोध हिन्दी कवी, लेखक, टीकाकार व संपादक (जन्म: १३ नोव्हेंबर १९१७)
१९७१ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १८९४)
१९७३ : चिलीचे राष्ट्राध्यक्ष साल्वादोर ॲलेंदे याचं निधन.
१९७३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि गुरू नीम करळी बाबा यांचे निधन.
१९७८ : बल्गेरियाचे कवी जॉर्जी मार्कोव्ह यांना फाशी देण्यात आली.
१९८७ : महादेवी वर्मा हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ, प्रयाग महिला विद्यापीठाच्या प्राचार्या (१९३३) व कुलगुरू, 'यामा' या काव्यसंग्रहासाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला. (जन्म: २६ मार्च १९०७)
१९९८ : क्रीडा महर्षी प्रिं. नोशीरवान दोराबजी तथा एन. डी. नगरवाला क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (जन्म: १० आक्टोबर १९०९ अहमदनगर, महाराष्ट्र)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ ५



# डीजे नको, डॉल्बी नको; भक्तीचा आणि संस्कृतीचा उत्सव हवा!

**आपला आनंद - दुसऱ्याच्या त्रासाचे कारण ठरू नये. | लातूर पोलिसांचे गणेश मंडळांना आवाहन | बालक, वृद्ध, गर्भवती महिला व रुग्णांचा विचार करून डीजे-डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करा**

लातूर । प्रतिनिधी

**गणेशोत्सव हा केवळ जल्लोषाचा नव्हे, तर श्रद्धा, भक्ती, संस्कृती, सामाजिक एकोपा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव आहे. उत्सव साजरा करताना कायद्याचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहेच; मात्र डीजे-डॉल्बीला कायद्याच्या मर्यादा आहेतच, पण माणूस म्हणूनही आपली काही जबाबदारी आहे, या भावनेतून यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन लातूर पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**

लातूर जिल्ह्यातील गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक यांच्यासोबत आयोजित शांतता समितीच्या बैठकींमध्ये पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी डीजे-डॉल्बीमुक्त गणेशोत्सवाबाबत सातत्याने मार्गदर्शन केले आहे. तसेच विविध प्रसारमाध्यमांच्या माध्यमातूनही नागरिकांना वारंवार आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा आनंदाचा आणि भक्तीचा असला तरी आपल्या आनंदामुळे दुसऱ्यांच्या आरोग्यावर किंवा शांततेवर परिणाम होऊ नये, याची प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**कायद्याचे पालन हीच पहिली जबाबदारी**

ध्वनीप्रदूषणाबाबत शासनाने निश्चित केलेले नियम व मर्यादा आहेत. सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपक, डीजे किंवा डॉल्बीचा वापर करताना या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते.

मात्र केवळ कारवाईच्या भीतीने नियमांचे पालन करण्यापेक्षा स्वतःहून सामाजिक जबाबदारी स्वीकारणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या उत्सवाच्या काही तासांच्या आनंदासाठी एखाद्या लहान बालकाची झोपमोड होणे, एखाद्या वृद्ध व्यक्तीला त्रास होणे, रुग्णाच्या प्रकृतीवर परिणाम होणे किंवा गर्भवती महिलेला अस्वस्थता निर्माण होणे, हे निश्चितच कोणत्याही संवेदनशील समाजाला अपेक्षित नाही.

**कर्णकर्कश आवाजाचा आरोग्यावर परिणाम**

डीजे-डॉल्बीमधून निर्माण होणारा मोठा आणि सततचा आवाज हा केवळ त्रासदायक नसून आरोग्यासाठीही घातक ठरू शकतो. मोठ्या आवाजाच्या संपर्कामुळे कानाच्या श्रवणशक्तीवर परिणाम होऊ शकतो. कानात सतत गुंजारव, शिट्टी किंवा घंटानादासारखा आवाज जाणवू शकतो. दीर्घकाळ मोठ्या आवाजाच्या संपर्कात राहिल्यास श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

ध्वनीप्रदूषणामुळे मानसिक ताण, चिडचिड, अस्वस्थता, एकाग्रतेचा अभाव आणि झोपेच्या समस्याही निर्माण होऊ शकतात. विशेषतः रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या मोठ्या आवाजामुळे लहान मुले, विद्यार्थी, वृद्ध आणि आजारी व्यक्तींच्या झोपेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

**बालक, वृद्ध आणि रुग्णांचा विचार करा**

गणेशोत्सवाच्या काळात अनेक ठिकाणी मंडप, मिरवणुका आणि सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या परिसरात राहणाऱ्या कुटुंबांमध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच गर्भवती महिला असू शकतात. त्यांच्या आरोग्याचा विचार करणे ही समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. रुग्णालये, दवाखाने आणि उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या परिसरात कर्णकर्कश आवाजामुळे त्यांना विश्रांती घेणे कठीण होऊ शकते. विद्यार्थ्यांना अभ्यास व एकाग्रतेत अडथळा निर्माण होऊ शकतो. वृद्ध व्यक्तींना अस्वस्थता आणि तणाव जाणवू शकतो.

**उत्सवाचा आनंद भक्तीत असावा, आवाजाच्या तीव्रतेत नव्हे**

गणेशोत्सवाची खरी ओळख ही आपल्या संस्कृतीत, परंपरेत, सामाजिक एकोप्यात आणि भक्तीभावात आहे. डीजेचा मोठा आवाज किंवा डॉल्बीची कर्णकर्कश ध्वनिव्यवस्था ही उत्सवाची गरज नाही. पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशा, लेझीम, झांज पथक आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही गणेशोत्सव उत्साहात आणि जल्लोषात साजरा करता येतो. माझा आनंद दुसऱ्याच्या त्रासाचे कारण ठरू नये, हा विचार प्रत्येक गणेशभक्ताने मनात ठेवला तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने समाजाला जोडणारा उत्सव ठरेल.

**लातूर पोलिसांचे गणेश मंडळांना आवाहन**

लातूर पोलीस विभागाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळे, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, यंदाचा गणेशोत्सव डीजे-डॉल्बीमुक्त, ध्वनीप्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक आणि सामाजिक सलोखा जपणारा साजरा करावा.

## पत्रकारांच्या समस्या नियमानुसार सोडविण्यास प्राधान्य -प्रवीण टाके

जालना। प्रतिनिधी

बदलत्या माध्यमविश्वात पारंपरिक पत्रकारितेसोबतच डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढले आहे. पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. पत्रकारांच्या विविध समस्या व मागण्यांवर नियमानुसार योग्य कार्यवाही करून त्या सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी दिली.उपसंचालक प्रवीण टाके यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल भवन येथे जालना जिल्ह्यातील पत्रकार व संपादकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी, सहायक संचालक सुरेश पाटील यांच्यासह विविध दैनिके, साप्ताहिकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



बैठकीत पत्रकारांनी ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अधिस्वीकृती पत्रिका, शासकीय कार्यक्रमांचे पास, जाहिरातींचे वितरण, तसेच शासकीय बातम्या व माहितीच्या वितरणातील समन्वय याबाबत सूचना व अपेक्षा मांडल्या.यावेळी श्री. टाके यांनी पत्रकारांच्या सूचना व समस्यांची नोंद घेत संबंधित प्रकरणांची नियमानुसार तपासणी करून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. शासकीय कार्यक्रमांसाठी माध्यम प्रतिनिधींना आवश्यक समन्वय साधण्यात येईल. जाहिरातींचे वितरण शासनाच्या नियमावलीनुसार करण्यात येते. स्थानिक माध्यमांना नियमांच्या चौकटीत आवश्यक सहकार्य मिळण्यासाठीही समन्वय साधला जाईल, असेही त्यांनी सांगितले. माहिती कार्यालय आणि पत्रकार यांच्यातील संवाद अधिक सुसूत्र करण्यासाठी माहिती वितरणाची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. पत्रकारांच्या प्रश्नांवर नियमितपणे चर्चा व्हावी, यासाठी भविष्यात अशा समन्वय बैठका घेण्यात येतील, असेही श्री. टाके यांनी सांगितले.

## सैदापूर ग्रामपंचायत खात्यातून १ लाख २ हजार रुपये गायब!

### ग्रामसेवक ढाकणे यांच्या परस्पर चेकबुकवर बनावट सह्या व शिक्का मारून रक्कम केली विड्रॉल

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मौजे-सैदापूर येथील वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेच्या सैदापूर ग्रामपंचायत शासकीय बँक खात्यातून तब्बल १ लाख २ हजार ४५ रुपये लाटल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून या घटनेला तब्बल ८ महिने उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस चौकशी वा कारवाई न झाल्याने पाथर्डी पंचायत समितीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे सैदापूर ग्रामपंचायत येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया पाथर्डी शाखेतील खाते क्र.५५५२९३९०७९ मधून ३० जानेवारी २०२६ रोजी १,०२,७४५/- रुपये शुभम विजय पोटफोडे (खाते क्र.२५०४१०२४२६८) बँक ऑफ महाराष्ट्र शेवगाव शाखा) या खाजगी व्यक्तीच्या खात्यावर/ठढत्रऋड द्वारे परस्पर वर्ग करण्यात आले शासकीय निधी थेट एका खाजगी व्यक्तीच्या खात्यावर वर्ग कसा व का करण्यात आला असा थेट सवाल गावकऱ्यांकडून विचारला जात आहे या संपूर्ण प्रकरणावर ग्रामसेवक संदीप लिंबाजी ढाकणे यांनी अत्यंत ठाम भूमिका मांडली आहे मार्च एंडिंगच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या विविध बँक खात्यांची चाचपणी व पडताळणी करत असताना सामान्यतः रोजच्या वापरात नसलेल्या या विशिष्ट योजनेच्या खात्यातून १ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम गायब झाल्याचे अचानक निदर्शनास आले असा खुलासा त्यांनी केला ज्या चेकबुकद्वारे हा व्यवहार झाला ते चेकबुकच ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाही यापूर्वीचे ग्रामसेवक(इम्रान खान दहिफळे व पुष्पा गायके) बदलून नवीन ग्रामसेवक संदीप ढाकणे हे पदभारावर आले तेव्हा तत्कालीन ग्रामसेवकांनी हे चेकबुक जमा केलेच नसावे असा संशय काही ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे वटवण्यात आलेल्या चेकवर व ठढत्रऋड अर्जावर मारण्यात आलेला ग्रामपंचायतीचा शिक्का व स्वाक्षरी पूर्णपणे बनावट असल्याचा गंभीर दावा ग्रामसेवक संदीप ढाकणे यांनी केला आहे यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांना वेळोवेळी लेखी पत्रे देऊनही निष्पक्ष तपास झालेला नाही चेकबुक व अर्जावरील इतर दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सह्यांच्या सत्यतेबाबत सखोल चौकशीनंतरच स्पष्टता येईल असे ग्रामसेवक संदीप ढाकणे यांचे म्हणणे आहे दरम्यान या घोटाळ्यामागे खरा आरोपी कोण ? असा प्रश्न उपस्थित होत असतानाच हा सर्व प्रकार सत्ताधारी पक्षातील एका मोठ्या बड्या नेत्याच्या निकटवर्तीयाशी संबंधित असल्यानेच यावर पुढील कोणतीही प्रशासकीय कारवाई केली जात नाही अशी खळबळजनक माहिती सैदापूर व हत्राळ येथील ग्रामस्थांकडून समोर येत आहे राजकीय दबावापोटी पाथर्डी पंचायत समितीचे अधिकारी गप्प बसले आहेत का असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत जर सह्या आणि शिक्के खोटे असतील तर प्रशासनाने तात्काळ विभागीय चौकशी व कडक पावले का उचलली नाहीत ? आणि जर सह्या खऱ्या असतील तर अपहार करणाऱ्यांना पाठीशी का घातले जात आहे ? सरकारी तिजोरीतून शासकीय निधी परस्पर गायब होत असताना राजकीय आश्रयामुळे प्रशासन हात बांधून बसले असेल तर जनतेने न्याय कुणाकडे मागायचा ? असा संतप्त सवाल सैदापूर आणि हत्राळ परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि बनावट सह्यांचा खेळ करणाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई न झाल्यास पाथर्डी पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सैदापूर व हत्राळ येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

## ए. जे. बोराडे यांच्या हस्ते जय भवानी गणेश मंडळाच्या मंडपाचे भूमिपूजन

मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील शिवसेना पुरस्कृत जय भवानी गणेश मंडळाच्या गणेश मंडपाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए. जे. बोराडे यांच्या शुभहस्ते विधिवत धार्मिक पूजाविधीने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहावयास मिळाला. या भूमिपूजनप्रसंगी शिव उद्योग सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रल्हादराव बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, नगरसेवक प्रदीप बोराडे, बाजार समितीचे संचालक दत्तप्रसाद बनसोडे, बाबाराव राठोड, डॉ. संतोष पवार, श्रीरंगराव खरात, तुळशीराम कोहिरे, अचित बोराडे, विष्णुपंत चव्हाण, पप्पू दायमा, नितीन मोरे, मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब बोराडे यांची उपस्थिती होती.

जय भवानी गणेश मंडळाने गेल्या ४१ वर्षांपासून गणेशोत्सवाची धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा सातत्याने जोपासली आहे. यंदाही विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, गणेशभक्तांना आकर्षित करणारे विविध कार्यक्रम मंडळाच्या वतीने घेण्यात येणार आहेत.गणेशोत्सवाच्या काळात मंडळाच्या वतीने भक्तिमय वातावरण निर्माण करण्याबरोबरच समाजप्रबोधनपर उपक्रमांनाही प्राधान्य दिले जाते.

यावेळी कृष्णा बोराडे, भगवान गायकवाड, महादेव खरात, अक्षयदीप वाघमारे, इद्रीस कुरेशी, सचिन गायकवाड, निलेश शिंगणे, संदीप बोराडे, मोरेश्वर बोराडे, लिंबाजी बोराडे, विकास घनवट, फिरोज पठाण, गोविंद बोराडे, अजय खंदारे, अक्षय पंडित, राज पाटे, भगवान बोराडे, सचिन काळे, पप्पू शेजूळ, अमोल वीरकर, करण बोराडे, रवि डहाळे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध गौण खनिज उत्खननावर महसूल विभागाची कारवाई

जालना। प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यातील मौजे हनुमंतखेडा येथे सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने धडक कारवाई केली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल तसेच उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी कार्तिक पाणिग्रही यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत अवैध गौण खनिज उत्खननासाठी वापरण्यात येणारे एक जेसीबी मशीन तसेच अवैध वाहतूक करणारे सहा ट्रॅक्टर पकडण्यात आले.



मौजे हनुमंतखेडा, तालुका जाफ्राबाद परिसरात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व त्याची वाहतूक होत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाल्यानंतर संबंधित पथकाने परिसरात कारवाई केली. कारवाईदरम्यान उत्खननासाठी वापरण्यात येणारे जेसीबी तसेच गौण खनिजाची वाहतूक करणारे सहा ट्रॅक्टर आढळून आले. महसूल विभागाच्या पथकाने तत्काळ ही वाहने ताब्यात घेतली.जप्त करण्यात आलेली सर्व वाहने पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन, टेम्भूर्णी यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. या प्रकरणात संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.गौण खनिजाच्या अवैध उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होण्याबरोबरच पर्यावरणावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाकडून नियमितपणे तपासणी व कारवाई करण्यात येत आहे.

## महावितरणचे कनिष्ठ अभियंता व वायरमेन पाच हजाराच्या लाचेच्या चक्रात अडकले

जालना । प्रतिनिधी

महावितरण विभागाचे नवनाथ दादा बेळे कनिष्ठ अभियंता महेश पाडळे वायरमन हे ५०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्या जाळ्यात अडकले. तालुका वैजापूर, रा. फुलेवाडी रोड वैजापूर, तालुका वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर महेश पाडळे, वय २६ वर्षे, पद-वायरमन नेमणूक सब स्टेशन खंडाळा, वर्ग-४ रा.लक्ष्मी नगर खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,तक्रारदार यांचे घरासाठी नवीन वीज जोडणी कनेक्शन साठी तक्रारदार यांनी ऑनलाईन अर्ज केला होता. नमूद अर्ज अनुषंगाने तक्रारदार हे उपकेंद्र खंडाळा येथील कनिष्ठ अभियंता श्री नवनाथ बेळे यांची भेट घेण्यासाठी दिनांक ०५/०९/२०२६ रोजी गेले असता श्री बेळे यांनी तक्रारदार यांना नवीन वीज कनेक्शन देणे साठी ५०००/-रु लाच मागणी केली अशा आशयाची लेखी तक्रार दि.०७/०९/२०२६ रोजी तक्रारदार हे महावितरण कनिष्ठ अभियंता नवनाथ बेळे यांचे कडे नवीन बीज जोडणी कनेक्शन बाबत विचारणा करण्यासाठी गेले असता नवनाथ बेळे यांनी पंचासमक्ष ५०००/-रुपये लाच मागणी करून पैसे वायरमन पाडळे यांचे कडे देणे साठी सांगितल्याचे निष्पन्न झाले.

दि.०८/०९/२०२६ रोजी मोजे बिलोनी ता. वैजापूर येथर्थील शेत गट क्रं. २१ मधील तक्रारदार यांचे घरी वायरमन महेश पाडळे हे नवीन वीज कनेक्शन जोडणी साठी आले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ५०००/- रू लाच घेतली असता त्यांना सापळा पथकाने लाचेचे रकमेसह ताब्यात घेतले.पोलिस ठाणे शिऊर जि छत्रपत्री संभाजीनगर येथे कलम ७ भ्र. प्र. अ. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

## नितिन जेथलिया यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन शेतकऱ्याचा पीक नुकसानीचा प्रश्न मांडला

परतुर । प्रतिनिधी

परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पावसाच्या दीर्घ खंडामुळे भेडसावत असलेल्या गंभीर पीक नुकसानीचा प्रश्न शासनाच्या स्तरावर तातडीने मांडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.यावेळी नितिन जेथलिया यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर, मंठा तसेच ग्रामीण भागातील सद्यस्थितीची संपूर्ण माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांना दिली.याप्रसंगी माजी मंत्री संजय बनसोडे, मा.आ.विक्रमबप्पा काळे हे देखील उपस्तिथ होते.यंदा अत्यल्प पाऊस तसेच मागील एक महिन्यापेक्षा अधिक काळ पडलेल्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिके मोठ्या प्रमाणावर बाधित



झाली असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास वाचविण्याची मागणी**

शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी व डिझेलसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. मात्र पिकांच्या महत्त्वाच्या वाढीच्या व उत्पादनाच्या काळात पावसाने मोठी दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जेथलिया यांनी केली.परतूर विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त गावांमध्ये महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत तात्काळ गावनिहाय व शेतनिहाय पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली.तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

पीकविमा योजनेअंतर्गत पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी महत्त्वाची मागणीही नितिन जेथलिया यांनी कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे केली.तसेच शासनाच्या निकषानुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व पीक नुकसानभरपाई, पीकविमा लाभ, आवश्यक कर्जसवलत व कर्ज पुनर्गठनाचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी नितिन जेथलिया यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी, पावसातील दीर्घ खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, संभाव्य उत्पादनातील घट आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती देऊन शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी भूमिका नितिन जेथलिया यांनी यावेळी व्यक्त केली.परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आज मोठ्या संकटातून जात आहेत. पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली नाही तर त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवेल. त्यामुळे तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई, शासकीय नुकसानभरपाई आणि पूर्वीचे ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे, असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन परतूर विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय व आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीवर कारवाई**

## सहा लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना। प्रतिनिधी**

**राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जालना पथकाने जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री तसेच वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवून १२ गुन्हे दाखल केले असून, एकूण ६ लाख ६५ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने दि. ६ ते ७ सप्टेंबर २०२६ दरम्यान ही कारवाई करण्यात आली. दोन दिवसांच्या या मोहिमेत अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले.**

यामध्ये चापडगाव, घणसावंगी, माळी, पाळवाडी, परतूर, भोरखेडा, देवखेडा, भोकरदन, धोत्रेखेड, देवगाव, माहोरा, बदनापूर, कैकाडी मोहल्ला, वाडीवाडी तांडा, सावखेडा, हॉटेल साई दरबार, एमआयडीसी जालना, जाधव ढाबा, दूधना फाटा, अंबड-केदारनगर, बदनापूर तसेच मयूर पान सेंटर आदी ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर आज (दि.८) रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक व दुय्यम निरीक्षकांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी जिल्ह्यातील अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्रीची ठिकाणे शोधून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, तसेच मद्याची अवैध वाहतूक करणारे आणि अवैधरित्या मद्य बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६



# दुष्काळाचे सावट असतानाही शेतकऱ्यांनी उत्साहात साजरा केला लाडक्या सर्जा-राजांचा बैलपोळा

ज्योतीराम पांढरपोटे/माजलगाव:- तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांवर संकटाचे सावट निर्माण झाले असले, तरी शेतकऱ्यांनी आपल्या काळ्या मातीशी आणि बळीराजाच्या जिवाभावाच्या साथीदारांशी असलेले नाते जपत सर्जा-राजांचा बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा केला.

शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या या मुक्या जीवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून पोळा सण साजरा केला जातो. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट असले, तरी आपल्या लाडक्या बैलांच्या सणात कुठलीही कमतरता राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या परीने तयारी केली.

पोळ्याच्या पूर्वसंध्येला बैलांना स्वच्छ धुऊन त्यांच्या अंगाला तेल लावण्यात आले. शिंगांना रंगरंगोटी करून आकर्षक सजावट करण्यात आली. गळ्यात घुंगरांच्या माळा, अंगावर झूल, कपाळावर गोंडे आणि विविध प्रकारच्या सजावटीच्या वस्तूंनी सर्जा-राजांना सजविण्यात आले. सजलेल्या बैलजोड्या पाहण्यासाठी गावागावांत नागरिकांनी गर्दी केली होती.



पोळ्याच्या दिवशी सकाळपासूनच शेतकरी आपल्या बैलजोड्यांना सजवून मिरवणुकीत सहभागी झाले. घरासमोर बैलांची पूजा करून त्यांना पुरणपोळी, गोडधोड पदार्थांचा नैवेद्य दाखवण्यात आला.अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीने बैलांची आरती करण्यात आली.



पावसाची प्रतीक्षा, पिकांची चिंता आणि दुष्काळाचे सावट मनात असतानाही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आपल्या सर्जा-राजांसाठीचा आनंद दिसून आला. संकट कितीही मोठे असले तरी शेतीशी, मातीतशी आणि पशुधनाशी असलेली नाळ कायम असल्याचे या उत्सवातून पुन्हा एकदा दिसून आले.

## दुष्काळातही जपली परंपरा

यंदा खरीप हंगाम संकटात सापडल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. मात्र,संकटाच्या काळातही शेतकऱ्यांनी बैलपोळ्याची परंपरा उत्साहाने जपत 'बैल आहे तर शेती आहे' हा भाव मनोमन जपला. सर्जा-राजांच्या पूजेनंतर चांगला पाऊस पडावा, शेतीला बहर यावा आणि बळीराजाच्या कष्टाला फळ मिळावे,अशी प्रार्थना यावेळी शेतकऱ्यांनी केली.

# महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावणारा चोरटा जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड/केज । प्रतिनिधी

दळण दळून पायी घरी परतणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन दुचाकीवरून येऊन हिसकावून नेणाऱ्या सराईत चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने बीड शहरात सापळा रचून जेरबंद केले आहे. धनाजी देविदास शिंदे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली सोन्याची चेन हस्तगत करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ मे २०२६ रोजी फिर्यादी महिला धान्य दळण्यासाठी गेल्या होत्या. दळण घेऊन घरी परत येत असताना अज्ञात इसमाने मोटारसायकलवरून येत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरीने हिसकावून पोबारा केला होता. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर २८८/२०२६, कलम ३०४(२) बी.एन.एस. (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास बीड स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत होते.



### सापळा रचून आवळल्या मुसक्या

गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, हा गुन्हा धनाजी देविदास शिंदे याने केला असून तो ती चोरीची सोन्याची चेन विक्री करण्यासाठी बीड शहरात येणार आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी बीडमध्ये सापळा रचून संशयितास शिताफीने ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे गुन्ह्यातील चोरीस गेलेली सोन्याची चेन मिळून आली. पोलिसांनी सोन्याची चेन जप्त करून आरोपी व मुद्देमाल पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या स्वाधीन केला असून केज पोलीस पुढील तपास करत आहेत.

सदर उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार दिलीप गिते, महेश जोगदंड, बप्पासाहेब घोडके, विकास राठोड आणि चालक गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

# बैलपोळ्यानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सर्जा-राजाचे विधिवत पूजन

आष्टी । प्रतिनिधी

बळीराजाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या बैलपोळा सणानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या 'अद्वैतचंद्र' निवासस्थानी गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) सर्जा-राजाचे विधिवत पूजन व औक्षण करून बैलपोळा सण पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी युवा नेते जयदत्त धस, सागर धस यांच्यासह धस कुटुंबीय उपस्थित होते.

शेतकऱ्याच्या शेतीच्या कामात वर्षभर खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून बैलपोळ्याला विशेष महत्त्व आहे. शेतीच्या मशागतीपासून विविध कामांमध्ये बळीराजाची साथ देणाऱ्या सर्जा-राजाला या दिवशी स्नान घालून, सजवून त्याचे पूजन केले जाते. याच पारंपरिक भावनेतून धस कुटुंबीयांनीही बैलपोळा सण साजरा केला.



'दुष्काळाचे सावट सरू दे, बळीराजाचे राज्य येऊ दे'; आमदार सुरेश धस यांची प्रार्थना

यावेळी सर्जा-राजाला स्नान घालून आकर्षक सजावट करण्यात आली. त्यानंतर आमदार सुरेश धस यांनी विधिवत पूजा व औक्षण करून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते तसेच ग्रामीण जीवनातील बैलांचे महत्त्व यावेळी अधोरेखित झाले.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत असताना बैलपोळ्याच्या निमित्ताने बळीराजासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. 'दुष्काळाचे सावट सरू दे, बळीराजाचे राज्य येऊ दे, वरुणराजाने कृपादृष्टी करावी, पान ३ वर

# परमेश्वर सातपुते यांची शिवसेना लातूर जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मुखपत्र 'सामना' मधून प्रसिद्ध झालेल्या अधिकृत नियुक्तीनुसार, हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेनेचे माजी बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांची लातूर जिल्हा संपर्कप्रमुख (कार्यक्षेत्र लातूर लोकसभा मतदारसंघ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



परमेश्वर सातपुते सर यांचा राजकीय आणि सामाजिक प्रवास हा तळागाळातील जनतेशी जोडलेला राहिला आहे. शिवसेनेमध्ये शाखाप्रमुख, किसान सेना जिल्हाप्रमुख आणि शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अशा विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी भूषविल्या आहेत. यासोबतच जनतेमधून काम करताना गावचे सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. त्यामुळे पक्षसंघटना, ग्रामविकास, शेतकरी, सहकार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांचा त्यांना दांडगा अनुभव आहे. शिवसेनेच्या माध्यमातून काम करत असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलने उभारणे, प्रशासनाला पान ३ वर

# बैलपोळा उत्साहात



## वर्षभर राबणाऱ्या शेतीमित्रांप्रती कृतज्ञता; विविध रंगांच्या बैलजोड्या ठरल्या आकर्षण

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा सण असलेला बैलपोळा दिंद्रुड,जवळा येथे ग्रामस्थांनी उत्साहात साजरा केला. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमित्रांची पूजा केली.

सणानिमित्त बैलांना स्वच्छ धुऊन रंगरंगोटी करण्यात आली. त्यांच्या शिंगांना आकर्षक रंग देत झुली, गोंडे व विविध अलंकारांनी सजविण्यात आले. निरनिराळ्या रंग व वर्णाच्या सजविलेल्या बैलजोड्या पोळ्याच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरल्या. शेतकऱ्यांनी बैलांची विधिवत पूजा करून त्यांना पुरणपोळी व विविध पदार्थांचा नैवेद्य दाखविला. वर्षभर उन्हात-पावसात शेतात राबणाऱ्या या मुक्या जीवांप्रती असलेली कृतज्ञता पोळ्याच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आली.

# दुष्काळाच्या सावटाखाली बैलपोळा सण उत्साहात

## युसूफवडगावच्या शेतकऱ्यांनी सर्जा-राजाप्रती व्यक्त केली कृतज्ञता

युसूफवडगांव । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र पावसाने दडी मारल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके पावसाच्या प्रतीक्षेत असताना शेतकऱ्यांवर संकटाचे सावट असले तरी केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे शेतकऱ्यांनी आपला पारंपरिक बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला.

वर्षभर शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून शेतीच्या कामात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती प्रेम, जिव्हाळा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण असल्याने शेतकऱ्यांसाठी बैलपोळ्याला विशेष महत्त्व आहे. दुष्काळी परिस्थिती असतानाही हौशी शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांना सजवून पोळ्याचा आनंद द्विगुणित केला.सकाळपासून बैलांना रंगीबेरंगी सजावट करून, शिंगांना रंग लावून त्यांना आकर्षक रूप देण्यात आले. सजविलेल्या बैलजोड्यांनी हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर पारंपरिक पद्धतीने त्यांना घरी नेण्यात आले. घरी सुवासिनींनी सर्जा-राजाची मनोभावे पूजा करून औक्षण केले आणि पान ३ वर



# २४ तासांत दुचाकी चोराला बेड्या; ४ मोटारसायकली जप्त

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने (डी.बी. पथक) कौतुकास्पद कामगिरी करत दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपीला अवघ्या २४ तासांच्या आत गजाआड केले आहे. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेल्या ॲक्सेस स्कुटीसह इतर तीन अशा एकूण चार महागड्या दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

बाबा चौक, इस्लामपुरा (बीड) येथील रहिवासी असलेल्या फिर्यादीने दिनांक ०७ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ११.०० वाजेच्या सुमारास आपली पांढऱ्या रंगाची सुझुकी ॲक्सेस स्कुटी (क्र. चक-२३-इघ-३१७३) घरासमोर उभी केली होती. दुसऱ्या दिवशी, दिनांक ०८ सप्टेंबर रोजी सकाळी ७.०० वाजेच्या सुमारास पाहिले असता सदर स्कुटी अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.



### पोलिसांची तत्परता आणि तपास

गुन्हा दाखल होताच पेठ बीड पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत अज्ञात आरोपीचा माग काढून त्यास ताब्यात घेतले. आरोपीकडे केलेल्या सखोल चौकशीत फिर्यादीची स्कुटी तसेच इतर ठिकाणांवरून चोरलेल्या आणखी तीन मोटारसायकली असा एकूण चार वाहनांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. सदरची उल्लेखनीय कामगिरी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. निलेश केळे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मुन्सर शहा, पोलीस हवालदार नितीन राठोड, सुभाष मोठे, पोलीस अंमलदार विष्णू गुज्जर, पांडुरंग परजणे, दिगांबर गिरी आणि अल्ताफ शेख यांनी पार पाडली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शहा करीत आहेत. पोलिसांच्या या जलद आणि धडक कारवाईबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# माजलगावात मानाचा बैलपोळा दिमाखात!

## शेटे कुटुंबीयांच्या बैलजोडीची पहिली मिरवणूक; ढोल-ताशांच्या गजरात शहर दुमदुमले

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकरी आणि बैलांच्या अतूट नात्याचे प्रतीक असलेला पारंपरिक बैलपोळा सण माजलगाव शहर व परिसरात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. प्रतिवर्षाप्रमाणे शहरातील मानाच्या शेटे कुटुंबीयांच्या बैलजोडीला मिरवणुकीचा पहिला मान मिळाला. शेटे कुटुंबीयांच्या बैलांची विधिवत पूजा करून ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीनंतर शहरातील पोळ्याच्या मिरवणुकांना सुरुवात झाली.



झेंडा चौक परिसरातील मानाचे शेतकरी विश्वनाथ विठ्ठलअप्पा शेटे यांच्या बैलांची प्रथम मिरवणूक काढण्यात आली. सजविलेल्या बैलजोडीची ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. झेंडा चौकातून सुरू झालेली ही मिरवणूक मस्जिद चौक, हनुमान चौक मार्गे पुढे गेली. हनुमान मंदिरात दर्शन घेतल्यानंतर मिरवणुकीची सांगता करण्यात आली. त्यानंतर बैलांची विधिवत पूजा करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. यावेळी सोमनाथ शेटे, पंचाक्षरी शेटे यांच्यासह शेटे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेटे कुटुंबीयांच्या मानाच्या मिरवणुकीनंतर शहरातील विविध भागांतील शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांच्या मिरवणुका काढल्या. यासोबतच गायी, वासरे यांनाही सजवून मिरवणुकीत सहभागी करण्यात आले. ढोल-ताशे, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि उत्साही वातावरणामुळे शहरातील

# पोलीस अधीक्षकांचा दणका; पाच सराईत गुन्हेगार तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात चोऱ्या आणि दिवस-रात्र घरफोड्या करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारी टोळीविरुद्ध बीड पोलिसांनी कठोर पाऊल उचलले आहे.



पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये आदेश पारित करून या टोळीतील प्रमुख आणि चार सदस्यांना बीड, लातूर तसेच धाराशिव या तीन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातून दोन वर्षांसाठी हद्दपार केले आहे.

### गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे संकेत

जिल्ह्यात टोळीने गुन्हे करणाऱ्या समाजकंटक व गुंडांविरुद्ध भविष्यातही कोणतीही गय न करता एमपीडीए , मकोका तसेच हद्दपारीसारख्या अत्यंत कडक कारवाया केल्या जातील, असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

टोळीविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल

हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये टोळी प्रमुख विरसिंग शेरसिंग गोके (वय २४, रा. पोलीस कॉलनीजवळ, अंबाजोगाई), तसेच टोळी सदस्य करणसिंग कुंदनसिंग जुन्नी (रा. पोलीस कॉलनीजवळ, अंबाजोगाई), रोशनसिंग रिसपालसिंग ऊर्फ यशपालसिंग टाक (वय २०, रा. पोलीस कॉलनीजवळ, अंबाजोगाई), मोहनसिंग मोहब्बतसिंग टाक (वय २१, रा. बसस्थानक पाठीमागे, वडवणी) आणि जिगरसिंग मोहब्बतसिंग टाक (वय २०, रा. बसस्थानक पाठीमागे, वडवणी) यांचा समावेश आहे. या टोळीवर मालाविरुद्धचे गंभीर गुन्हे, घरफोडी व चोरीचे अनेक गुन्हे दाखल असून त्यांची सर्वसामान्यांमध्ये मोठी दहशत होती.

या टोळीच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी आणि टोळीची पांगापांग करण्यासाठी धारूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. डी. बी. वाघमोडे यांनी महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये हद्दपारीचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सादर केला होता. गुन्हेगारांची पार्श्वभूमी आणि जनतेच्या मालमत्तेची सुरक्षा लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांनी या टोळीला दोन वर्षांसाठी पान ३ वर

# गेवराई येथे शिवसेना (उबाठा) पक्षाची प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रमुख राजू भाई शेख यांच्या जनसंपर्क कार्यालयात आज पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. आगामी राजकीय व सामाजिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवणे आणि लोकहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला पक्षाचे प्रमुख नेते आणि मार्गदर्शक प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये गेवराई विधानसभा संपर्क प्रमुख पंढरीनाथ खोपडे, तालुका प्रमुख अजय भैय्या दाभाडे, युवा नेते राहुल चाळक आणि शहर प्रमुख राजू भाई शेख यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.




बैठकीत पक्षाच्या आगामी ध्येयधोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीला शिवसेनेचे खंबीर शिलेदार मुक्ताराम मोटे, महेबुब भाई, अखिल भाई, शरद ढवारे, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk